शुक्रवार, २९ एप्रिल २०२२
◆ वर्ष १४ ◆ अंक २८१
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## औरंगाबादमधील 'राज'सभेला अखेर सशर्त परवानगी



**औरंगाबाद** : येत्या १ मे रोजी अर्थात महाराष्ट्र दिनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या औरंगाबादमधील प्रस्तावित सभेला परवानगी मिळाली आहे. गेल्या काही दिवसांपासून या परवानगीवरून बरीच चर्चा सुरू झाली होती. विशेषत: मनसेचा गुढीपाडवा मेळावा आणि ठाण्यातील 'उत्तर'सभेमध्ये राज ठाकरेंनी मशिदींवरील भोंग्यांबाबत घेतलेल्या भूमिकेवरून मोठा गाजावाजा झाला होता. या पार्श्वभूमीवर त्यांच्या सभेला परवानगी मिळणार की नाही यावरून तर्क-वितर्क सुरू झाले होते, तर या सभेला परवानगी मिळणारच, असा विश्वास मनसेकडून व्यक्त करण्यात आला होता. अखेर ती परवानगी देण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे. दरम्यान, औरंगाबादमधील सभेला सशर्त परवानगी देण्यात आल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.


## अंतरंग

ठाकरे सरकारकडून जनतेची लूट -भंडारी/२

जेएनपीए ठरले देशातील सर्वोत्तम लॉजिस्टीक बंदर/६

रायगडातील यशस्वी शरीरसौष्ठवपटूंचा सत्कार/८


# महाराष्ट्रात फक्त सत्तेचे 'भोगी'!

## राज ठाकरे यांचे ठाकरे सरकारवर टीकास्त्र

**मुंबई : प्रतिनिधी**

उत्तर प्रदेश सरकारने भोंग्यांच्या आवाजासंदर्भात कारवाई सुरू केल्याबद्दल महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ व त्यांच्या सरकारवर कौतुकाचा वर्षाव केलाय, मात्र त्याच वेळी त्यांनी महाराष्ट्रात सत्तेत असणाऱ्या ठाकरे सरकारवर निशाणा साधला आहे.

उत्तर प्रदेश सरकारने ३० एप्रिलपर्यंत भोंग्यांच्या आवाजासंदर्भात तातडीने कारवाई करण्यासंदर्भातील निर्देश जिल्हास्तरीय प्रशासनाला दिल्यानंतर राज्यात भोंग्याविरोधातील मोहीम सुरू करण्यात आली आहे. त्यानुसार तेथे ११ हजारांहून अधिक धार्मिक स्थळांवरील भोंगे



काढण्यात आलेत, तर ३५ हजारांहून अधिक ठिकाणी भोंग्यांच्या आवाजावर नियंत्रण ठेवण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

मागील आठवड्यात मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी या विषयासंदर्भात वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली होती. या बैठकीत मुख्यमंत्री योगी यांनी

### भोंग्यांवरील कारवाईबद्दल यूपीचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचे मानले आभार

प्रत्येक व्यक्तीला त्याच्या धार्मिक मान्यतांचे पालन करण्याचा अधिकार आहे, मात्र त्याचा दुसऱ्यांना त्रास होणार नाही याचीही काळजी घेतली गेली पाहिजे, असे मत व्यक्त केले होते. भोंगे वापरण्याला हरकत नाही, मात्र भोंग्यांचा आवाज त्या धार्मिक स्थळांच्या आवातापुरता मर्यादित राहील याची काळजी घ्या. याचा इतर लोकांना काही त्रास होता कामा नये, असे मुख्यमंत्री योगी बैठकीमध्ये म्हणाले होते. यानंतर गृह विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत हिंदू आणि मुस्लीम धर्मीय नेत्यांनी चर्चा केली. या चर्चेदरम्यान दोन्ही समाजाच्या धार्मिक नेत्यांनी भोंग्यांचा आवाज कमी करण्यावर सहमती दर्शवली.

योगी सरकारच्या या निर्णयावर सोशल मीडियावरून व्यक्त होताना राज यांनी एक पोस्ट केलीय. यात त्यांनी उत्तर प्रदेशमधील धार्मिक स्थळांवरील, विशेषत: मशिदींवरील भोंगे उतरवल्याबद्दल योगी सरकारचे मन:पूर्वक अभिनंदन आणि आभार, असे म्हटलेय. पुढे बोलताना राज यांनी, आमच्याकडे महाराष्ट्रात 'योगी' कुणीच नाही, आहेत ते फक्त सत्तेचे 'भोगी'!, अशा शब्दांत ठाकरे सरकाव निशाणा साधलाय, तर पोस्टच्या शेवटच्या ओळीत महाराष्ट्र सरकारला सबुद्धी मिळो हीच आई जगदंबेचरणी प्रार्थना, असेही नमूद केलंय.

## सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते पनवेलमध्ये पथदिव्यांचे उद्घाटन

### हेमलता म्हात्रे यांच्या नगरसेवक निधीतून सुविधा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका प्रभाग समिती 'क'च्या माजी सभापती आणि विद्यमान नगरसेविका हेमलता म्हात्रे यांच्या माध्यमातून प्रभागात विकासाची अनेक कामे सुरू आहेत. त्या अंतर्गत त्यांच्या नगरसेवक निधीमधून पथदिवे उभारण्यात आले आहेत. या पथदिव्यांचे उद्घाटन सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते बुधवारी (दि. २७) झाले.



कार्यतत्पर नगरसेविका हेमलता म्हात्रे यांच्या नगरसेवक निधीतून पनवेलमधील श्री समर्थ बैठक हॉलजवळ, जिंदाल रेसिडेन्सी आणि पोलीस ठाणे येथील मुणोथ रेसिडेन्सीसमोरील रस्त्यावर पथदिवे उभारण्यात आले आहेत. या पथदिव्यांच्या उदघाटन समारंभास भाजप प्रभाग १४चे अध्यक्ष गणेश म्हात्रे, युवा मोर्चा शहर उपाध्यक्ष आकाश डोंगरे, प्रभाग उपाध्यक्ष शावेज रिजवी, उज्ज्वला पाटील, भारती पाटील, हेमंत म्हात्रे, हर्षल म्हात्रे, अविनाश पाटील, भावेश गायकर, जोशी, रमेश पाटील आणि रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी नगरसेविका हेमलता म्हात्रे यांच्याकडून सुरू असलेल्या विकासकामांबद्दल त्यांचे कौतुक केले.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पावसाळ्यात नको

### राज्य निवडणूक आयोगाचे सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पावसाळ्यात घेणे अवघड असल्याचे सांगत राज्य निवडणूक आयोगाने या संदर्भातील प्रतिज्ञापत्र सर्वोच्च न्यायालयात सादर केले आहे.

ओबीसी राजकीय आरक्षणाचा वाद उफाळल्यापासून महाविकास आघाडी सरकारच्या अडचणींमध्ये वाढ झाली आहे. विरोधी पक्ष भाजपसह सर्वच पक्षांनी ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणुका नकोत,



अशी भूमिका घेतली आहे. आता ओबीसी आरक्षणासंदर्भातील सुनावणी ४ मे रोजी आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालय निवडणूक आयोगाच्या प्रतिज्ञापत्रावर काय निर्णय देते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

महाराष्ट्रात पावसाळ्यात वादळी-वारा आणि पाऊस मोठ्या प्रमाणावर असतो. त्यामुळे या दिवसांमध्ये निवडणुका घेणे अडचणीचे होईल. ४ मे रोजी जर ओबीसी आरक्षणावर निर्णय आला, तर त्याचे संपूर्ण नियोजन करण्यात जून आणि जुलै जाईल. त्यामुळे जून-जुलैमध्ये निवडणुका घेणे शक्य नाही, असे कारण निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात दिले आहे.

## सोमय्या पिता-पुत्रांना हायकोर्टाचा दिलासा

### अंतरिम अटकपूर्व जामिनास मुदतवाढ

**मुंबई : प्रतिनिधी**

आयएनएस विक्रांत युद्धनौका निधी कथित प्रकरणात भाजप नेते किरीट सोमय्या आणि त्यांचा मुलगा नील सोमय्या यांना मुंबई उच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. सोमय्या पिता-पुत्रांना १४ जूनपर्यंत अंतरिम अटकपूर्व जामीन वाढविण्याचे आदेश हायकोर्टाने दिले आहेत.

विक्रांत युद्धनौकेने भारत-पाकिस्तान युद्धात मोठी भूमिका बजावली होती. या युद्धनौकेची देखभाल करण्यास सरकारने असमर्थता दर्शविल्यानंतर त्याचा लिलाव न करता त्याचे संग्रहालयात रूपांतर करावे, अशी मागणी झाली. 'विक्रांत'ला वाचविण्यासाठी सोमय्यांनी पुढाकार घेत निधी गोळा केला होता.

## वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रम




**कामोठे : सामाजिक कार्यकर्ते रवी गोवारी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून नगरसेविका हेमलता गोवारी यांच्या पाठपुराव्यातून उभारण्यात येणाऱ्या पथदिव्यांच्या कामाचे भूमिपूजन आणि नगरसेवक निधीतून डस्टबिनचे वाटप सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते बुधवारी झाले.** (वृत्त पान ३ वर..)

## निवडक

### जम्मू-काश्मीरच्या पुलवामात दोन दहशतवाद्यांना कंठस्नान

**श्रीनगर :** जम्मू-काश्मीरमधील पुलवामा जिल्ह्यात सुरक्षा दलांशी रात्रभर झालेल्या चकमकीत अल-बद्र संघटनेचे दोन दहशतवादी ठार झाले आहेत. लपलेल्या दहशतवाद्यांनी गोळीबार केल्याने सैन्य दलाने दिलेल्या प्रत्युत्तरात एजाज हाफिज आणि शाहिद अयुब हे दोन स्थानिक दहशतवादी ठार झाले. त्यांच्याकडून दोन एके रायफल्स जप्त करण्यात आल्या आहेत, अशी माहिती पोलिसांनी दिली.

### देशात कोरोना रुग्णसंख्या पुन्हा तीन हजारांच्या पार

**नवी दिल्ली** : देशातील दैनंदिन



कोरोनाबाधितांच्या संख्येने पुन्हा एका तीन हजारांचा आकडा पार केला आहे. देशात गुरुवारी (दि. २८) सकाळी संपलेल्या २४ तासांत तीन हजार ३०३ कोरोनाबाधित रुग्णांची नोंद करण्यात आली. ३९ जणांचा मृत्यू झाला, तर दोन हजार ५६३ जण कोरोनामुक्त झाले. दरम्यान, देशात कोरोनाने उपचार घेणाऱ्यांची संख्या १६ हजार ९८० इतकी आहे.





**उलवे नोड : वर्गीस जॉर्ज, सीना वर्गीस, रतनलाल पनवार, कविता पनवार यांनी एशिया ट्रेडेनिका हा कन्सल्टन्सीचा नवीन व्यवसाय सुरू केला आहे. त्यांच्या कार्यालयाचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते गुरुवारी करण्यात आले. या वेळी त्यांनी कन्सल्टन्सी व्यवसायाच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. उद्घाटन समारंभास गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, भाजप नेते सुधीर ठाकूर, विश्वनाथ कोळी, किशोर पाटील, अनंता ठाकूर, आशिष घरत, किरण देशमुख, अर्चना मिश्रा, डिंपल जगदाळे, गौरवकुमार शील, अनिल राठोड, शैलजा गायकवाड, पूजा आंब्रे आदी उपस्थित होते.**

## राजस्थानहून आणलेल्या तब्बल ८९ तलवारी धुळ्यात जप्त

### चौकडी अटकेत

**धुळे : प्रतिनिधी**

राजस्थानातील चित्तोडगड येथून जालना येथे शस्त्रास्त्रे नेणाऱ्या चौघांना मुंबई-आग्रा महामार्गावर गस्तीवर असलेल्या सोनगीर पोलिसांनी बुधवारी (दि. २७) सकाळी पाठलाग करून पकडले. त्यांच्या वाहनातून तब्बल ८९ तलवारी आणि एक खंजीर जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी जालना येथील चार जणांना अटक करण्यात आली आहे. एवढ्या तलवारी जप्त केल्याने खळबळ उडाली आहे.

सोनगीर पोलिसांना वाघाडी फाट्याजवळ शिरपूरकडून धुळ्याकडे येणारी संशयास्पद कार नजरेस पडली. पोलिसांनी कारसह सुमारे सात लाखांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी मोहम्मद शरीफ, मोहम्मद शफिक, शेख इलियास शेख लतिफ, सय्यद रहिम व कपिल विष्णू दाभाडे यांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याविरोधात सोनगीर पोलीस ठाण्यात भा.दं.वि. कलम १८४, २३९, १७७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, इतक्या मोठ्या प्रमाणात तलवारी कशाला? कुणाला दंगल घडवायची आहे? महाराष्ट्रात तलवारी पाठवणारे राजस्थानमधील कोण लोक आहेत? या प्रकरणाचा खोलवर तपास केला पाहिजे. ठाकरे सरकार ही चौकशी करणार का, असा सवाल भाजप आमदार राम कदम यांनी केला आहे.

## राज्यात पुढचे पाच दिवस उष्ण लहरींचा इशारा

**मुंबई** : येत्या पाच दिवसांमध्ये राज्यात, विशेषत: विदर्भात उष्ण लहरींचा अंदाज हवामान खात्याकडून वर्तविण्यात आला आहे. त्यामुळे एरवीच तापलेल्या विदर्भाला पुढील पाच दिवस उन्हाचा तीव्र चटका सहन करावा लागण्याची शक्यता आहे. पाच दिवस उष्ण लहरींचा अंदाज असताना त्यातही ३० एप्रिल ते २ मे या कालावधीमध्ये तर तीव्र उष्ण लहरींचा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर विदर्भातील जनतेला पुढील किमान आठवडाभर उन्हाच्या झळांपासून स्वत:चे संरक्षण करण्याच्या आव्हानाचा सामना करावा लागणार आहे, तर दुसरीकडे दक्षिण मध्य महाराष्ट्रात आणि दक्षिण कोकणात मेघगर्जनेची शक्यता आहे.





**कामोठे : भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते अक्षरा मेडिकल ॲण्ड जनरल स्टोअरचे उद्घाटन बुधवारी झाले तसेच सभागृह नेते परेश ठाकूर यांनी या ठिकाणी भेट देत दुकानाचे मालक दत्तात्रय ओवे यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, नगरसेवक विकास घरत, भटके विमुक्त महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष विद्या तामखडे, चंद्रकांत ओवे, सुदर्शन ओवे, आबासाहेब ओवे, संतोष येळे, अंकुश ओवे, मोहन ओवे, लालासो ओवे, सुरेश पावणे, सुखदेव खांडेकर, राजू ओवे, देवेंद्र कोल्हटकर, विक्रम ओवे, संदेश ओवे, महेश मदने, दादासाहेब चबरे, गेंदाप्पा सुळे, लवअंकुश शिंगाडे, प्रमोद शिंगाडे, शरद पाटील, नामदेव शिंगाडे, ज्ञानेश्वर शिंगाडे, धनाजी ओवे, रोहन ओवे, उत्तम कारंडे, विलास खताळ, राजू खरजे आदी उपस्थित होते.**


## वाचाल तर वाचाल!

जाणून घ्या साहित्यिकांच्या आवडत्या पुस्तकांविषयी...

दैनिक राम प्रहरच्या अंकात रविवार, १ मे २०२२पासून सुरू होत आहे नवे पाक्षिक सदर 'वाचाल तर वाचाल!'. या सदरात दर पंधरवड्याला आमच्या प्रिय वाचकांच्या भेटीला आणणार आहोत

साहित्यिकांची आवडती पुस्तके दर महिन्याच्या पहिल्या व चौथ्या रविवारी

आपला अंक राखून ठेवा..!




# ठाकरे सरकारकडून जनतेची लूट

## भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष माधव भंडारी यांची घणाघाती टीका

**मुंबई : प्रतिनिधी**

केवळ अहंकारापोटी ठाकरे सरकार पेट्रोल-डिझेलवरील व्हॅटमध्ये कपात करण्यास नकार देऊन महाराष्ट्रातील सामान्य जनतेची लूट करीत आहे, अशी घणाघाती टीका भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष माधव भंडारी यांनी गुरुवारी केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पेट्रोल डिझेल वरील व्हॅट कमी करण्याच्या केलेल्या आवाहनाला उत्तर देताना जीएसटीचा मुद्दा पुढे करून मुख्यमंत्र्यांनी आपल्या अज्ञानाचे पुन्हा दर्शन घडविले आहे, असेही त्यांनी म्हटले आहे. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. प्रदेश उपाध्यक्ष आ. संजय कुटे यावेळी उपस्थित होते. ते म्हणाले की, महाराष्ट्रात पेट्रोलवर ३२ रु.१५ पैसे इतका व्हॅट आकारला जातो आहे. केंद्र सरकारने पेट्रोल-डिझेल वरील उत्पादन शुल्कात कपात केल्यानंतर भाजपाशासीत राज्यांनी पेट्रोल-डिझेल वरील व्हॅट तातडीने कमी केला, मात्र महाराष्ट्र, राजस्थान, पश्चिम बंगाल, केरळ, झारखंड, तेलंगणा, आंध्र प्रदेश या राज्यांनी पेट्रोल-डिझेलवरील व्हॅट कमी केला नाही. राज्यांनीही पहिल्या अखत्यारीतील



करांचे ओझे कमी करून नागरिकांना दिलासा द्यावा अशी अपेक्षा होती. पण दारूवरील कर कमी करणाऱ्या ठाकरे सरकारने पंतप्रधानांचे आवाहन झुगारून राजकारण सुरूच ठेवले व त्याचा थेट फटका नागरिकांना बसला. गेल्या सहा महिन्यांत या करांपोटी राज्य सरकारने तब्बल साडेतीन हजार कोटींचा महसूल कमावला आहे.

सामान्य नागरिकांच्या खिशात हात घालून केलेल्या या कमाईबद्दल जनतेची माफी मागण्याऐवजी, केंद्र सरकारवर टिका करुन जनतेची दिशाभूल करणारे

### मुख्यमंत्र्यांकडून मूळ मुद्द्यांनाच बगल!

दूरसंवाद माध्यमांतून जनतेस संबोधित करताना केंद्राकडून सहकार्य मिळत नसल्याचे सांगणाऱ्या ठाकरे यांनी मूळ मुद्द्यास बगल देत केंद्रावर आगपाखड करण्यास सुरुवात केल्याने, पेट्रोल-डिझेलवरील राज्याचे कर कमी करण्याचे पंतप्रधानांचे आवाहन झुगारत जनतेची लूट सुरूच ठेवण्याचा ठाकरे यांचा खेळ उघड झाला आहे.

ठाकरे सरकार जीएसटीचा पूर्ण परतावा मिळाल्यानंतर पेट्रोल-डिझेलवरील राज्याकडून आकारला जाणारा भरमसाठ दर कमी करणार आहे का? महाराष्ट्राने राज्यांतर्गत कर कमी केल्यास पेट्रोल डिझेलचे भाव किमान दहा टक्क्यांनी कमी होऊन नागरिकांना दिलासा मिळू शकतो. पण ठाकरे सरकारची ती इच्छा नाही. केंद्र सरकारशी संघर्ष करण्याच्या ठाकरे सरकारच्या खुमखुमीमुळे नागरिकांना वेठीस धरले जात आहे, असेही त्यांनी नमूद केले.

भंडारी पुढे म्हणाले, आपण शिवतीर्थावरील सैनिकांच्या मेळाव्यात बोलत नसून, मुख्यमंत्रीपदावरून देशाच्या पंतप्रधानांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देत आहोत, याचे भान मुख्यमंत्री ठाकरे यांनी ठेवले असते तर पंतप्रधानांचा दावा खोडून काढण्याच्या अविर्भावात त्यांनी नागरिकांची दिशाभूल करण्याचे धाडस केले नसते. जीएसटी परतावा आणि पेट्रोल-डिझेलवरील कर आकारणी या दोन्ही संपूर्ण स्वतंत्र बाबी आहेत. जमा होणारा वस्तू व सेवा कराचा परतावा राज्याला सातत्याने मिळत असून मुख्यमंत्री म्हणतात ती थकबाकी नाही. ही रक्कम केंद्राकडून महाराष्ट्रास मिळण्याकरिता जुलै २०२२ पर्यंतचा अवधी असल्याने थकबाकी असल्याचा कांगावा करून ठाकरे हे नागरिकांचीही दिशाभूल करत आहेत. मुळात ही रक्कमदेखील २६ हजार कोटी एवढी नाही हे स्पष्ट असताना ठाकरे यांनी मुख्यमंत्रीपदाच्या जबाबदारीचे भान ठेवणे आवश्यक होते. १३ हजार ७८२ कोटींचा परतावा राज्य सरकारला अगोदरच मिळालेला असून उर्वरित १३ हजार ६२७ कोटी जुलैपर्यंत मिळणार आहेत.

# पेण चिंचपाड्यात एकावर चॉपरचे वार; गुन्हा दाखल

**पेण : प्रतिनिधी**

पेणमधील चिंचपाडा येथे जतीन पाटील हे मोटारसायकल वरून जात असताना आरोपी याने त्यांच्यावर दगडाने वार करून साक्षीदारावर चॉपरने वार केल्याची घटना बुधवारी (दि. २७) सायंकाळी ५.३५ च्या सुमारास घडली आहे.

अधिक माहिती अशी, फिर्यादी जतीन चंद्रकांत पाटील रा. दया अपार्टमेंट, कवंडाळतळे, ता.पेण हे त्यांच्या मोटारसायकलने जात होते. त्यांच्या पाठीमागे नेहार किशोर परमार (रा.गोदावरीनगर) हे बसले होते. मोटारसायकल ही बाजार समिती पेण ते चिंचपाडा येथे जाणाऱ्या रोडवर वॉशिंगसेंटर समोर आली असता आरोपी सूरज गणेश म्हात्र (रा. पीर डोंगरी) याने भांडणाचा रोष मनात धरून फिर्यादी यांच्या मोटारसायकलच्या पाठीमागून येवून पाटील यांना आवाज देत थांबण्यास सांगितले. पाटील हे न थांबल्याने आरोपी रा.पिरडोंगरी, ता.पेण याने पाटील यांना शिवीगाळ केली. आरोपी याने त्यांची मोटारसायकल थांबविली असता आरोपी हा मोटारसायकल वरून उतरून त्याने मसाला मिरचीपुड पाटील यांच्या तोंडावर फेकल्याने ते डोळे चोळू लागल्याने त्यावेळेस आरोपी याने फिर्यादी यांना धक्काबुक्की केली. रस्त्याच्या बाजूचा दगड उचलून पाटील यांच्या डोक्यात मारणार हे पाहून पाटील यांनी त्यास अडविण्यासाठी हात समोर धरला असता तो दगड फिर्यादीच्या उजव्या हाताच्या पंजावर व डोक्यास मागच्या बाजूला लागला. तसेच उजव्या हाताचा पंजा फ्रॅक्चर होवून डोक्यास दुखापत झाली. तसेच साक्षीदार नेहरू परमार व दुसरा साक्षीदार दीपेश म्हात्रे रा. पीर डोंगरी हे फिर्यादी व आरोपी यांचे भांडण सोडवत असताना आरोपी याने त्याच्याजवळील कटर चाकूचा वार पाटील यांच्या उजव्या मांडीवर करून दुखापत केली व पाटील यांच्या मोटारसायकलवर दगड मारून मोटारसायकलचे नुकसान केले. याबाबत पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस नाईक कौशिक फेंगडू हे करीत आहेत.

# माझ्या आयुष्यातील शेवटची वर्षे आरोग्य क्षेत्रासाठी समर्पित -रतन टाटा

**मुंबई : प्रतिनिधी**

देशातील आघाडीचे उद्योगपती रतन टाटा यांनी कोरोना साथीच्या पहिल्या लाटेत पीएम केअर फंडमध्ये सुमारे दीड हजार कोटी रुपये मदत केली होती. आता त्यांनी आपल्या आयुष्यातील शेवटची वर्षे आरोग्य क्षेत्रासाठी समर्पित करणार असल्याची घोषणा केली आहे.

आसाममधील डिब्रूगड येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते कर्करोग उपचार केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. याच कार्यक्रमात रतन टाटांनी ही घोषणा केली. सुरुवातीला इंग्रजीतून आणि नंतर हिंदीतून केलेल्या भाषणात त्यांनी म्हटले की, मी माझ्या आयुष्यातील शेवटची वर्षे आरोग्य क्षेत्रासाठी समर्पित करणार आहे. या वेळी त्यांचे शरीर थकलेले दिसले. बोलताना त्यांचा आवाजदेखील थरथरत होता. अशा स्थितीतही त्यांनी हा महत्त्वाचा निर्णय घेतला.

आसाममध्ये १७ कॅन्सर उपचार केंद्रांचे नेटवर्क तयार करण्यात येत आहे. या रुग्णालयांमधून केवळ आसामच नव्हे; तर देशभरातील सर्वच रुग्णांना सुलभ उपचार मिळेल. कारण कर्करोग हा केवळ श्रीमंतांचा आजार नाही. अत्याधुनिक सुविधांमुळे आसाम जागतिक दर्जाचे कर्करोग उपचार देणारे सक्षम राज्य म्हणून ओळखले जाईल. आसामच्या इतिहासात आजचा दिवस अत्यंत महत्त्वाचा असल्याचेही त्यांनी म्हटले.

जीवदान मिळणार आहे. कर्करोगावर उपचार करणारे टाटा समूहाचे हे देशातील सर्वात मोठे जाळशे असणार आहे. यातील सात कर्करोग उपचार केंद्राचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले आहे. या वेळी आसामचे राज्यपाल जगदिश मुखी, केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल आणि आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा उपस्थित होते.

## महिलेशी असभ्य वर्तन; एकाला अटक

**पनवेल : वार्ताहर**

तालुक्यातील हेदुटणे गावात राहणारा संजय मिश्रा (३८) याने महिला घरात एकटी असल्याचे पाहून या महिलेशी जवळीक साधण्याच्या उद्देशाने फ्लॅटचा मुख्य दरवाजा व हॉलमध्ये बाल्कनीत प्रवेश केला तसेच बेडरूम खिडकीची स्लायडिंगची काच वाजवून या महिलेचा पाठलाग केला.

याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आल्यानंतर या व्यक्तीस पनवेल तालुका पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# उरण तालुक्यात विशेष सहाय्य योजनेंतर्गत वर्षभरात १ कोटी ६२ लाख ७२ हजारांचे वाटप

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यात विशेष सहाय्य योजनेंतर्गत मार्च २०२२पर्यंत एकूण १,३५६ लाभार्थ्यांना वर्षभरात एक कोटी ६२ लाख ७२ हजार रक्कम देण्यात आली अशी माहिती नायब तहसिलदार संदीप खोमणे यांनी दिली.

दरम्यान शासनाच्या गोरगरिबांसाठी संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ राज्य निवृत्ती वेतन योजना गट अ, इंदिरा गांधी वृद्धापकाळ निवृत्ती वेतन योजना, इंदिरागांधी विधवा



निवृत्ती वेतन योजना व राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना अशा विविध योजना आहेत. या अंतर्गत उरण तालुक्यात संजय गांधी निराधार अनुदान योजना एकूण लाभार्थी ७९४, श्रावणबाळ राज्य निवृत्ती वेतन योजना गट अ लाभार्थी १२२, इंदिरा गांधी वृद्धापकाळ निवृत्ती वेतन योजना लाभार्थी १३८, इंदिरा गांधी विधवा निवृत्ती वेतन योजना लाभार्थी २२ आदी सर्व योजनेतून १,३५६ लाभार्थी आहेत. त्यांना वर्षभरात एक कोटी ६२ लाख ७२ हजार रक्कम देण्यात आली आहे.

गुरुवार (दि. २८) उरण तालुक्यातील चिरनेरजवळील मीना सुनील कातकरी (रा. आक्कादेवी वाडी), दर्शना चंद्रकांत कातकरी (रा. आक्कादेवी वाडी) यांना राष्ट्रीय कुटूंब लाभ योजनेतून प्रत्येकी २० हजार रुपयांचा धनादेश नायब तहसीलदार खोमणे यांच्या हस्ते देण्यात आला.





पनवेल भाजपतर्फे

जनहितार्थ

माहितीसाठी

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**शुक्रवार, दि. २९ एप्रिल २०२२ रोजी होणारे**

**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

कोविशिल्ड कोव्हॅक्सिन कार्बेव्हॅक्स

**सर्व केंद्रांवर (वयोगट :** १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल ■ ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे ■ ६. टाटा अॅडव्हान्स सेंटर, खारघर
- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- ८. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पुर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**

**ग्रामीण लसीकरण**

■ मुर्बी ■ सिध्दी करवले नागझरी/ चाल ■ पडघे ■ खिडुकपाडा ■ खुटारी इनामपुरी ■ धरण/धरणा कॅम्प

**ग्रामिण लसीकरण सत्रांत दि. १८.०४.२०२२ पासून तक्त्यात नमूद केलेल्या गावामध्ये वयोगट १२-१४ यांस कार्बेव्हॅक्स व १५ ते १८ वयोगटातील लाभार्थ्यांसाठी कोव्हीक्सिन लस उपलब्ध असणार आहे.**

**Precautionary Dose बाबत माहिती**

- शासकीय कोविड लसीकरण केंद्रांमध्ये ६० वर्ष वरील नागरीकांना, तसेच FLW, HCW यांना दुसरा डोस घेऊन ९ महिने(३९ आठवडे/२७३ दिवस) झालेल्या लाभार्थ्यांना Precautionary Dose पुर्वी प्रमाणेच उपलब्ध होणार आहे.
- दि. १०.०४.२०२२ पासून सर्व खासगी कोविड लसीकरण केंद्रांमध्ये १८-५९ वर्ष (Year of birth 1963-2004) वरील नागरीकांचे दसरा डोस घेऊन ९ महिने(३९ आठवडे/२७३ दिवस) झालेल्या नागरीकांना Precautionary Dose उपलब्ध होणार आहे.
- खासगी कोविड लसीकरण केंद्रांमध्ये लसीकरण **सशुल्क** असणार आहे.
- **१८-५९** वय नागरीकांचे Precautionary Dose हे **फक्त खाजगी कोविड लसीकरण केंद्रांमध्ये** उपलब्ध असेल. या लसीकरणाकरीता **कुठलेही नविन रजिस्ट्रेशन** करण्याची आवश्यकता नाही.
- **१८-५९** वय नागरीकांचे Precautionary Dose च्या लाभार्थ्यांनी दुसऱ्या डोस चे सर्टिफिकेट/
- दुसरा डोस घेताना वापरलेला ID Proof व दुसऱ्या डोस करीता दिलेला मोबईल नंबर लसीकरण केंद्रावर सोबत घेऊन जावा.
- या लसीकरीताची शुल्क रु. २२५+GST + रु. १५० पर्यंत सर्विस शुल्क शासनाने ठरविले आहे. लागणार आहे. मामाजबाबदारा
- नागरीकांना लस घेताना पहिले दोन डोस ज्या लसीचे घेतले आहेत तीच लस Precautionary Dose साठी घ्यावी लागणार आहे.
- लाभार्थ्यांना कोविन अॅप वर कोणत्या खासगी लसीकरण केंद्रांवर लसीकरण सुरु आहे हे दिसणार आहे त्याप्रमाणे कोविन वर Online Booking करुन किंवा प्रत्यक्ष लसीकरण केंद्रांवर देखील Booking करुन लस घेता येईल.


# नवीन पनवेलमध्ये सुटीच्या दिवशी पर्यावरणपूरक बससेवा होणार सुरू

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पर्यावरणपूरक वाहतुकीच्या दिशेने नवी मुंबई परिवहन उपक्रमाचा प्रवास सुरू आहे. रविवारी सुटीच्या दिवशी फक्त विद्युत व सीएनजी बसमधून प्रवासी वाहतुकीच्या प्रयोग यशस्वी होत असल्याने आता शनिवार, रविवार व सार्वजनिक सुटीच्या दिवशी 'नो डिझेल बस'चा निर्णय एनएमएमटी प्रशासनाने घेतला आहे. जानेवारीपासून सुरू असलेल्या या उपक्रमातून परिवहनची महिन्याला ६० ते ७० लाखांची बचत होत आहे.

प्रदूषणातील अत्यंत घातक घटक असलेल्या कार्बनचे प्रमाण कमी करण्याचा निर्धार नवी मुंबई पालिकेने केला आहे. त्या दृष्टीने विविध उपाययोजना सुरू आहेत. पालिका वापरत असलेली वाहने तसेच

### परिवहनच्या उपक्रमामुळे ६० ते ७० लाखांची बचत

एनएमएमटीच्या ताफ्यातील सर्व वाहने ही विद्युत अथवा सीएनजी इंधनावरील करण्यात येत आहेत. सध्या परिवहन उपक्रमात १८० विद्युत, १२० सीएनजी आणि २७२ डिझेलवर चालणाऱ्या बस आहेत.

या सर्व बसमधून दररोज प्रवासी वाहतूक करण्यात येत आहे. मात्र डिझेल दरवाढीमुळे परिवहनचा तोटा वाढला आहे. त्यामुळे परिवहन उपक्रमाने जानेवारीपासून एक नावीन्यपूर्ण उपक्रम हाती घेतला आहे. रविवारी फक्त विद्युत व सीएनजी बसमधूनच प्रवासी वाहतूक केली जात आहे. १५ जानेवारीपासून सुरू करण्यात आलेल्या या नवीन उपक्रमामुळे इंधनापोटी ६० ते ७० लाखांची बचत होत आहे.

**१५ जानेवारीपासून रविवारी सार्वजनिक सुटीच्या दिवशी विद्युत व सीएनजी बसचा वापर केल्यामुळे शनिवारी व रविवारी प्रत्येकी आठ हजार लिटर याप्रमाणे १६ हजार लिटर म्हणजेच एका महिन्यात ६४ हजार लिटर पेट्रोलची बचत होत आहे. यातून महिन्याला ६० ते ७० लाख रुपयांची बचत होत आहे. त्यामुळे सुटीच्या दिवशी पर्यावरणपूरक बस चालवण्यात येणार आहे.**

**-योगेश कडुस्कर, परिवहन व्यवस्थापक**

## माझ्यावरील हल्ल्यांची सीबीआयमार्फत चौकशी करा -किरीट सोमय्या

**मुंबई : प्रतिनिधी**

आपल्यावर झालेल्या हल्ल्यांची निःपक्षपाती चौकशी होण्यासाठी या घटनांचा तपास केंद्रीय अन्वेषण विभागाकडे सोपविण्यात यावा, अशी मागणी करणारी याचिका भाजप नेते डॉ. किरीट सोमय्या यांनी मुंबई उच्च न्यायालयात दाखल केली आहे.

याचिकेत डॉ. सोमय्या यांनी म्हटले, अलीकडच्या काळात शिवसेनेच्या कार्यकर्त्यांकडून झालेल्या हल्ल्यांच्या घटनांचा व त्या अनुषंगाने पोलिसांच्या वर्तनाचा उल्लेख केला आहे. याचिकेत म्हटले आहे की, आपण बांद्रा पोलीस स्थानकात एफआयआर दाखल करण्यास गेलो होतो. आपले म्हणणे नोंदवून घेतल्यावर पोलीस निरीक्षक राजेश देवरे यांनी वस्तुस्थितीचा विपर्यास करणारा बनावट एफआयआर दाखल केला, असेही ते म्हणाले.

# विक्री योजना फसवणूकप्रकरणी फरार आरोपीला अटक करा -आ. कुटे

**मुंबई : प्रतिनिधी**

महिला गृहउद्योगाच्या नावाखाली राज्यभरातील हजारो महिलांची कोट्यवधींची फसवणूक झाली असून या प्रकरणाची आर्थिक गुन्हे शाखेच्या विशेष चौकशी पथकामार्फत चौकशी करावी व या घोटाळ्याचा मुख्य सूत्रधार अजित हिवरे याला तातडीने अटक करावी, अशी मागणी भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष आमदार संजय कुटे यांनी गुरुवारी (दि. २८) केली. या मागणीचे निवेदन राज्याचे गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांना देण्यात आले असून फसवणूक झालेल्या महिलांना न्याय मिळाल्याखेरीज भाजप स्वस्थ बसणार नाही, असा निर्धारही आमदार कुटे यांनी व्यक्त केला.


भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत आ. कुटे बोलत होते. भाजपा प्रदेश उपाध्यक्ष माधव भंडारी यावेळी उपस्थित होते. आमदार कुटे म्हणाले, अजित हिवरे यांनी राधाकृष्ण सेल्स कॉर्पोरेशन या कंपनीमार्फत महिलांना स्वयंरोजगार देण्याचा व्यवसाय सुरु केला.

मसाले पॅकिंग मशीन, बटन तयार करणारी मशीन, आटा मशीन याची विक्री मल्टी लेव्हल मार्केटिंग पद्धतीने करण्यासाठी सुमारे २६ जिल्ह्यांत या कंपनीच्या शाखा उघडल्या. जिल्ह्याजिल्ह्यात महिला डेव्हलपमेंट ऑफिसर नेमून व्यवसाय सुरु केला. प्रत्येक मशीनची किंमत ११ ते १५ हजार रु. ठेवण्यात आली. या मशीनद्वारे निर्माण केलेला माल कंपनीकडून खरेदी करण्याचे आश्वासनही देण्यात आले. सुरुवातीला दोन-तीन महिने महिलांनी खरेदी केलेल्या मशीनच्या मार्फत तयार झालेल्या वस्तू कंपनीने खरेदीही केल्या. त्यानंतर मात्र कंपनीकडून वस्तू खरेदी बंद झाली. आता तर कंपनीचे पुण्यातील कार्यालय बंद करण्यात आले असून कंपनीचा मालक हिवरे हा फरार झाला आहे.

हजारो महिलांनी ११ हजार रुपये भरून मशीन खरेदी केल्या आहेत. आपली फसवणूक झाल्यावर अनेक ठिकाणी महिलांनी पोलिसांकडे तक्रारी दाखल केल्या आहेत. त्यानुसार काही ठिकाणी गुन्हे दाखल झाले आहेत, असेही ते म्हणाले.

**दुखवटा**

## सीताबाई ठाकूर



भाजपचे केळवणे पंचायत समिती विभागीय अध्यक्ष हिरामण ठाकूर यांची आई सीताबाई सीताराम ठाकूर यांचे बुधवारी (दि. २७) अल्पशा आजाराने निधन झाले. त्या ७४ वर्षांच्या होत्या. त्यांच्यावर दिघाटी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी विविध क्षेत्रांतील लोक, ग्रामस्थ, नातेवाईक उपस्थित होते.

सीताबाई ठाकूर यांच्या पश्चात पती, तीन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातसून, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. कै. सीताबाईंचा दशक्रिया विधी शुक्रवारी (६ मे) श्रीक्षेत्र नाशिक येथे, तर उत्तरकार्य रविवारी (दि. ८ मे) दिघाटी येथे होणार आहे, अशी माहिती कुटुंबीयांनी दिली.

# पनवेल परिसरात विनाहेल्मेट दुचाकीस्वारांवर कारवाई

## नियमांच्या उल्लंघनाविरोधात वाहतूक विभागाची मोहीम

**पनवेल : वार्ताहर**

दुचाकी चालवताना हेल्मेट न वापरणाऱ्या वाहनचालकांवर पनवेल शहर वाहतूक विभागाच्या वतीने कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. शहरातील ठाणा नाका, शिवशंभो नाका, छत्रपती शिवाजी महाराज चौक, उरण नाका, पंचरत्न सर्कल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर, एसटी स्टँड परिसर, नवीन पनवेल आदी ठिकाणी वाहतूक विभागाचे अधिकारी व कर्मचारीवर्गाकडून विना हेल्मेट दुचाकी स्वारांवर कारवाई करण्यात आली आहे.

नवी मुंबई वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त पुरुषोत्तम कराड यांच्या सूचनेनुसार पनवेल शहर वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक संजय नाळे यांच्या नेतृत्वाखाली वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या तसेच विशेषतः विनाहेल्मेट दुचाकी चालवणाऱ्या वाहनचालकांच्या लायसन्स निलंबनाची कारवाई केली जात आहेत.

सध्या 'ई चलन' प्रणालीमुळे बहुसंख्य दुचाकीचालक हेल्मेट घालायला लागले आहेत, काही प्रमाणात वाहतुकीचे नियमही पाळले जात आहेत, परंतु अजूनही काही वाहनचालक



नियमांना बगल देत स्वतःचा व इतरांचा जीव धोक्यात आणत आहेत. गेल्या तीन महिन्याच्या दरम्यान पनवेल शहर वाहतूक विभागाच्या वतीने विना हेल्मेट दुचाकी चालवणाऱ्या एकूण ५२९६ दुचाकीस्वारांवर कारवाया करण्यात आल्या आहेत. त्यापैकी १३३ लायसन्स तीन महिन्यांसाठी निलंबित करण्यात आले आहेत. यातील ७७ लायसन्स आरटीओकडे पाठवले असून अद्याप ५६ लायसन्सधारक दंडाची रक्कम भरण्यास न आल्याने ते शिल्लक ठेवण्यात आले आहेत. त्यांच्यावर योग्य कारवाई करण्यात येणार असल्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय नाळे यांनी सांगितले.

गेल्या काही वर्षात मोठ्या प्रमाणात दुचाकींची संख्या वाढली आहे. दुचाकींची संख्या वाढण्यासोबतच वाहतुकीच्या नियमांच्या उल्लंघनाचे प्रमाणही वाढले आहे. त्यातच स्पीड बाईक्स, स्पोर्ट्स बाईक, मॉडीफाईड बाईक्सचे ठराविक तरूणवर्गात वेड आहे. त्यामुळे काही दुचाकीस्वार भरधाव वेगाने दुचाकी चालवत असतात. त्यामुळे अनेकदा अपघाताचे प्रसंग ओढवतात. दुचाकी चालवताना हेल्मेटचा वापर करणे हे रस्ता सुरक्षेच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचे आहे. बहुतांश दुचाकी वाहनांच्या अपघातामध्ये जखमी होणारे वा निधन पावणारे वाहनचालक हे हेल्मेट शिवाय प्रवास करणारे असतात. त्याचबरोबर दुचाकींचे सर्वाधिक अपघात हे अंतर्गत रस्त्यांवर झाले आहेत. तसेच हेल्मेट परिधान केल्यामुळे अपघाती मृत्यूंचे प्रमाण घटल्याचे वारंवार समोर आले आहे. हेल्मेट वापरणे सुरक्षिततेच्या दृष्टीने अधिक गरजेचे असल्याचे मत सुज्ञ नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

> **विनाहेल्मेट वाहन चालवणे हे कायद्याच्या दृष्टीने अयोग्यच आहे. त्याप्रमाणेच स्वतःच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने देखील हेल्मेट वापरणे आवश्यक आहे. एखाद्या वेळेस अपघाताच्या परिस्थितीत हेल्मेट प्राण वाचवू शकते. त्यातच आरटीओच्या दंडातही भरमसाठ वाढ झाली आहे. सर्वसामान्य नागरिकांना हे दंड परवडण्यासारखे नाहीत. त्यामुळे वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्यासोबतच दुचाकी चालवताना हेल्मेट वापरून स्वतःच्या जिवाचीही सुरक्षितता बाळगावी. वाहतुकीच्या नियमांचे भान राखावे.**
>
> **–संजय नाळे, पोली निरीक्षक**
> **वाहतूक विभाग, पनवेल शहर**

## मसाज पार्लरच्या नावाखाली खारघरमध्ये वेश्याव्यवसाय

### स्पाचा चालक, मालक पोलिसांच्या ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

स्पा आणि मसाज पार्लरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय चालविणाऱ्या खारघर सेक्टर-७ मधील ओश्यानिक स्पा ॲन्ड सलुनवर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने छापा टाकला. या कारवाईत मसाज पार्लरचा चालक, मालक या दोघांना ताब्यात घेतले आहे. या कारवाईत ५ महिलांना ताब्यात घेऊन त्यांची सुटका करण्यात आली आहे.

**पाच महिलांची सुटका**

खारघर सेक्टर-७ मधील रावेची हाईट्स इमारतीतील ओश्यानिक स्पा ॲन्ड सलुनमध्ये बॉडी मसाजच्या नावाखाली वेश्याव्यवसाय चालविण्यात येत असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पराग सोनवणे व त्यांच्या पथकाने ओश्यानिक स्पा ॲन्ड सलुनमध्ये एक बनावट ग्राहक पाठवून खातरजमा केली. यावेळी स्पामध्ये वेश्याव्यवसाय चालविण्यात येत असल्याची खात्री पटल्यानंतर पोलिसांच्या पथकाने सदर स्पावर छापा टाकला. यावेळी ५ महिलांकडून मसाजच्या नावाखाली वेश्याव्यसाय करुन घेण्यात येत असल्याचे आढळून आले.

पोलिसांनी या महिलांकडे केलेल्या चौकशीत स्पा चालक व मालक हे बॉडी मसाजच्या बहाण्याने ग्राहकांसोबत वेश्यागमन करण्यास सांगत असल्याचे सांगितले. त्यानंतर पोलिसांनी स्पा ॲन्ड सलुनचा चालक भिमाराम माळी व स्पा मालक विमल परमार या दोघांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करुन दोघांना ताब्यात घेतले.



## टिळक लॉ कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा पनवेल तहसील येथे अभ्यास दौरा

**पनवेल : वार्ताहर**

लोकमान्य टिळक लॉ कॉलेज विद्यार्थ्यांनी पनवेल तहसील कार्यालयाला अभ्यास दौरा अंतर्गत भेट दिली. या वेळी तलाठी, मंडळ अधिकारी यांनी त्यांना मार्गदर्शन केले.

पनवेलचे तहसिलदार विजय तळेकर यांनी विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला. यावेळी जमीन विषयक, कायदे संदर्भात विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. या विद्यार्थ्यांची पनवेल तहसील कार्यालयात ही पहिलीच भेट होती. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या मनातील अनेक प्रश्न विचारले. यावेळी न्यायालयीन अधिकार काय असतात, महसूल संबंधातील नियम काय असतात तसेच सातबारा, आठ अ, फेरफार विषयीची माहिती तहसिलदार विजय तळेकर यांनी लॉच्या विद्यार्थ्यांना दिली. तहसिलदार संजीव मांडे यांनीदेखील विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

## रवी गोवारी यांच्या वाढदिवसानिमित्त कामोठ्यात विविध सामाजिक उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सामाजिक कार्यकर्ते रवी गोवारी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून कामोठ्यात विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. त्या अंतर्गत पनवेल महापालिकेच्या नगरसेविका हेमलता गोवारी यांच्या पाठपुराव्यातून उभारण्यात येणाऱ्या पथदिव्यांच्या कामाचे भूमिपूजन आणि नगरसेवक निधीमधून डस्टबिनचे वाटप सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते बुधवारी (दि. २७) करण्यात आले. या वेळी त्यांनी रवी गोवारी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.





नगरसेविका हेमलता गोवारी यांनी कामोठे सेक्टर १२ व १४मध्ये पथदिवे उभारण्यात यावे यासाठी महापालिकेकडे पाठपुरावा केला होता. त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असून सेक्टर १२मध्ये दोन ठिकाणी, तर सेक्टर १४ येथे एका ठिकाणी पथदिवे उभारण्यात येणार आहेत. या कामाचा भूमिपूजन सोहळा तसेच कामोठ्यातील २९ सोसायट्यांना हेमलता गोवारी यांच्या नगरसेवक निधीतून डस्टबिन वाटप कार्यक्रम सामाजिक कार्यकर्ते रवी गोवारी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमास नगरसेविका कुसुम म्हात्रे, भाजप कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, युवा नेते हॅप्पी सिंग, रमेश तुपे, सुशील शर्मा, युवा मोर्चा शहर अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, शरद जगताप, प्रवीण कोरडे, नवनाथ भोसले, जय पावणेकर, उत्कल घाडगे, साधना आचार्य, वैशाली जगदाळे, हरपिंदर सिंग यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन जयदादा युवा मंच व इतर कार्यकत्यांनी केले होते. जयकुमार डिगोळे, गोमेश म्हात्रे, तेजस जाधव, रवी भगत, अनिकेत म्हात्रे, प्रशांत मिश्रा, आशुतोष सोनावणे, संदीप भांगे, तेजस खाडे, गणेश सोलंकी, मनमीत सिंग, सत्यम शर्मा, रॉबीन जैस्वाल यांनी यावेळी विशेष मेहनत घेतली.

## वेब सिरीजच्या नावाने लाखोंची फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

वेब सिरीजमध्ये काम मिळवून देण्याच्या बहाण्याने एकाने कामोठे येथे राहणाऱ्या तरुणीच्या माध्यमातून अनेक तरुण-तरुणींकडून नोंदणीच्या नावाने पावणे दोन लाख रुपये उकळून त्यांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

अफराक शाहिद सिद्दीकी (३२) असे या ठकसेनाचे नाव असून कामोठे पोलिसांनी त्याच्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरु केला आहे. दरम्यान एका महिलेचा इव्हेन्ट मॅनेजमेंटचा व्यवसाय आहे. तिला शॉर्टफिल्म बनवायची असल्याने तिने मित्राच्या ओळखीतून आरोपी अफराक शाहिद सिद्दीकी याची भेट घेतली होती. अफराक याने स्नेहलला संपर्क साधून त्याला वेब सिरीजचे काम मिळाल्याचे सांगत त्यासाठी काही व्यक्तींची आवश्यकता असल्याचे सांगत प्रत्येकाकडून सात हजार पाचशे याप्रमाणे पैसे घेतले, मात्र काम न देता त्याने फोन बंद केल्याने तिने पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

## फुंडे येथे चला उद्योजक घडवूया एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात



**उरण : प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेच्या फुंडे येथील वीर वाजेकर कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय महालण विभाग फुंडे येथे चला उद्योजक घडवूया या एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन नुकताच करण्यात आले होते.

या कार्यशाळेच्या उद्घानासाठी प्रमुख पाहुणे म्हणून संजीवन म्हात्रे हास्य प्रबोधनकार व आगरी-कऱ्हाडी कोळी उद्योजक संस्थेचे अध्यक्ष संजीवन म्हात्रे होते. त्यांनी आपल्या बहारदार हास्य शैलीत विद्यार्थ्यांनी उद्योजक का व्हावे व उद्योजक होण्यासाठी आपल्या स्वतः मध्ये फक्त हिम्मत सातत्य व विनम्रता आवश्यक आहे. आपण करू इच्छित उद्योगाच्या संकल्पना महाविद्यालया मार्फत पोहोचवा, आमची संस्था व आपले यशस्वी उद्योजक आपणास आवश्यक ती सर्व मदत करेल असे सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. जी. पवार हे उपस्थित होते. त्यांनी मार्गदर्शन सांगितले, वीर वाजेकर महाविद्यालयाचे विद्यार्थी यशस्वी उद्योजक कसे बनतील या प्रयत्नात आजची ही उद्योजक घडवुया कार्यशाळा हे पहिले पाऊल आहे. पुढील शैक्षणिक वर्षांत उद्योजक व्हावे असे वाटणार्या १०० विद्यार्थ्यांना महाविद्यालयातर्फे विशेष उपक्रम राबविण्यात येईल व त्यांना उद्योजक होण्यासाठी लागणारी सर्व माहिती व मार्गदर्शन उपलब्ध करण्यात येईल असे जाहीर केले.

## कायदेविषयक जनजागृती शिबिर



**उरण : बातमीदार**

उरण तालुका विधी सेवा समिती व उरण तालुका वकील संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने लहान मुलांविषयीच्या विविध कायद्यांबद्दल माहिती देण्यासाठी कायदेविषयक शिबिराचे (दि. २७) रोजी रोटरी इंग्लिश मिडियम हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स अँड कॉमर्स, बोरी-उरण येथे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाला दिवाणी न्यायाधीश कनिष्ठस्तर उरण तथा विधी सेवा समिती उरणचे अध्यक्ष निलेश वाली यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. उरण तालुका वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. डी. व्ही. नवाळे व उपाध्यक्ष ॲड. किशोर ठाकूर व ॲड. पराग म्हात्रे, ॲड. धीरज डाकी, ॲड.जिवीका डाकी, ॲड. अर्चना माळी उपस्थित होते. शाळेच्या प्रशासकीय अधिकारी पुष्पा कुरूप यांनी प्रास्ताविक केले. संस्थेच्या वतीने विकास महाजन, सेक्रेटरी प्रसन्न कुमार, खजिनदार, शाळेच्या प्राचार्य अक्षता घरत व मुख्याध्यापिका संजिता थळी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. संस्थेचे अध्यक्ष शेखर म्हात्रे यांनी आयोजकांचे, उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार मानले.

## नवी मुंबईतील पाणथळ क्षेत्राला मिळणार संरक्षण

### पर्यावरणप्रेमींच्या शिफारसींना हिरवा कंदिल

**उरण : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्राधिकरणाने हवाई सुरक्षेच्या दृष्टीने नवी मुंबईतील पाणथळींचे रक्षण करण्याकरिता बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीने सुचवलेल्या शिफारसींचा समावेश केला असल्याचे संकेत विमानतळ नियंत्रित प्रकल्प प्रस्तावकाने आपल्या अहवालात दिले आहेत. त्यामुळे नवी मुंबई विमानतळाकडून पाणथळ क्षेत्राला संरक्षण मिळणार आहे.

नवी मुंबई विमानतळ प्रकल्पासाठी पर्यावरण आणि सीआरझेडच्या मंजुरीची मुदत नोव्हेंबर महिन्यात संपली असल्याने एनव्हायर्नमेंट इम्पॅक्ट असेसमेंट (ईआयए) ने नव्याने अहवाल केला असून तो नवी मुंबई विमानतळ प्राधिकरणाकडून केंद्रीय हवामान, वन आणि हवामान नियंत्रण मंत्रालयाकडे पाठवण्यात आला आहे.




(संग्रहित छायाचित्र)

नवी मुंबई विमानतळ परिसरातील पाणथळ क्षेत्रात सध्याच्या स्थितीत कोणताही बदल केल्यास पक्ष्यांचा अधिवास आणि भक्ष्यस्थान धोक्यात येऊ शकते. तसे झाल्यास पक्ष्यांच्या रोजच्या नैसर्गिक हालचालींवर परिणाम होऊन हवाई सुरक्षेलाही धोका निर्माण होईल, असे नियंत्रित प्रकल्प प्रस्तावकाने एनव्हायर्नमेंट इम्पॅक्ट असेसमेंट (ईआयए) ने आपल्या निरीक्षणात म्हटले आहे. त्यात बीएनएचएसकडून करण्यात आलेल्या शिफारशींचा समावेश करण्यात आल्याची माहिती नॅट कनेक्ट फाऊंडेशनचे संचालक बी. एन. कुमार यांनी दिली.

जैविकदृष्टया महत्त्वाच्या असलेल्या क्षेत्रांचे (पाणथळ) रक्षण आणि संवर्धन करणे ही प्रस्तावकाची जबाबदारी आहे. एनआयआय संकुल, दिल्ली पब्लिक स्कूल, चाणाक्य संस्था, पाणजे, न्हावा शेवा पोलीस ठाणे आणि जासई या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर पक्षी आढळतात. ईआयए अभ्यास हा हैदराबाद येथील विमता लॅब्ज लिमिटेडने तयार केला असून त्यात बीएनएचएसच्या काटेकोर शिफारशींकडे लक्ष वेधण्यात आलेय.

**विमानतळ प्राधिकरणाचा अहवाल सादर**

*सेव्ह नवी मुंबई एनव्हायर्नमेंट फोरमने एनआरआय आणि चाणाक्य संस्था परिसरातील पाणथळ क्षेत्राचे परिवर्तन गोल्फ कोर्समध्ये करण्याविरुद्धची लढाई उच्च न्यायालयात जिंकली असून आता या क्षेत्राचे रक्षण होईल, असे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्राधिकरणाने अहवालात या सकारात्मक विकासाबद्दल लिहिले असल्याचे सांगण्यात आले आहे.*

## उरणमध्ये ध्वजारोहण कार्यक्रम

**उरण : वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६२व्या वर्धापन दिन समारंभानिमित्त रविवारी (दि. १ मे) रोजी सकाळी ८ वाजता आमदार महेश बालदी यांच्या हस्ते उरण तहसील कार्यालय येथील प्रांगणात मुख्य शासकीय ध्वजारोहण कार्यक्रम होणार आहे. उरणचे तहसीलदार भाऊसाहेब अंधारे यांनी ही माहिती प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली.



**पनवेल : रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन येथील भाजपचे तालुका उपाध्यक्ष अन्वर उंद्रे यांच्या पनवेलच्या राहत्या घरी रोजा इफ्तारीसाठी कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर, नगरसेवक अनिल भगत, भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष, पिंपरी चिंचवड प्रभारी व ज्येष्ठ पत्रकार सय्यद अकबर, दैनिक रायगड टाईम्सचे पनवेल तालुका ब्युरो चिफ किरण बाथम आदी उपस्थित होते.**

## संपादकीय

# डोळेझाक धोक्याची ठरेल

कोरोनाचा धोका अद्याप टळलेला नाही, त्यामुळे सगळ्यांनी सावधगिरी बाळगली पाहिजे अशी स्पष्ट सूचना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी केली. कोरोना महासाथीसंदर्भात पंतप्रधानांनी सर्व मुख्यमंत्र्यांशी चर्चा केल्यानंतर महाराष्ट्रातील महाविकास आघाडी सरकारकडून याविषयी काही ठोस निर्देश दिले जातील, अशी अपेक्षा होती, पण परिस्थितीवर लक्ष ठेवून आहोत इतकेच काय ते मंत्रिमंडळ बैठकीनंतर सांगण्यात आले. सावधगिरीविषयीची जनतेची बेफिकीरी आणि वेळीच योग्य पावले उचलण्याबाबत राज्य सरकारकडून चाललेली चालढकल या दोन्ही बाबी चिंता वाढवणाऱ्या आहेत.

**दिल्ली, हरियाणा आणि उत्तर प्रदेशपाठोपाठ गेल्या दोन आठवड्यांत केरळ आणि महाराष्ट्रातही कोरोना रुग्णांच्या संख्येत वाढ दिसू लागताच सर्व संबंधितांना परिस्थितीविषयी चिंता वाटू लागणे स्वाभाविक होते. साहजिकच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी तातडीने देशभरातील मुख्यमंत्र्यांची व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे बैठक बोलावली. सर्वांनी कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा वापर करावा तसेच आरोग्यविषयक पायाभूत सुविधांकडे दुर्लक्ष केले जाऊ नये, असा सल्ला मोदींनी या वेळी दिला. यापूर्वीच्या तिन्ही लाटांमधील अनुभव लक्षात घेता कृत्रिम श्वसनयंत्रे, प्राणवायुचा पुरवठा आदी आरोग्यविषयक सुविधांचे वेगाने आधुनिकीकरण करणे आवश्यक आहेच तसेच चौथ्या लाटेला तोंड द्यावे लागलेच तर आवश्यक मनुष्यबळ विकसित करण्याच्या दृष्टीनेही कामाला लागले पाहिजे. गेल्या दोन वर्षांतील इस्पितळांतील आग लागण्याच्या दुर्घटना पाहता त्यांचे सुरक्षा ऑडिटही काळजीपूर्वक केले पाहिजे आदी बाबींकडे मोदींनी नेमकेपणाने लक्ष वेधले. पंतप्रधानांसोबतच्या या बैठकीनंतर राज्यातील आघाडी सरकार त्या दिशेने काय हालचाल करते याकडे सर्वांचे लक्ष लागले होते, पण गुरुवारच्या मंत्रिमंडळ बैठकीनंतर, आम्ही संख्येकडे लक्ष ठेवून आहोत, तूर्तास तरी मास्कसक्तीचा निर्णय नाही एवढेच काय ते राज्याच्या आरोग्यमंत्र्यांनी सांगितले. सध्या मुंबईत कोरोना रुग्णांची संख्या वेगाने वाढत असून बुधवारी मुंबईत ११२ नव्या रुग्णांची नोंद झाली. यापैकी एकाच रुग्णाला इस्पितळात दाखल करावे लागले असले तरी राज्यभरातील दैनंदिन रुग्णसंख्येमध्ये ६० टक्के रुग्ण मुंबईतील आहेत हे लक्षात घ्यायला हवे. फेब्रुवारीनंतर प्रथमच मुंबईतील रुग्णसंख्या इतकी वाढली आहे. एकीकडे देशभरात कोरोना रुग्णांची संख्या वाढत असताना तिसऱ्या बूस्टर लसीचा डोस घेण्याला मिळत असलेला अत्यल्प प्रतिसाद चिंतेत भर घालतो आहे. हा तिसरा डोस घेतल्याशिवाय आपल्याला ओमायक्रॉन आणि त्याच्या बदलत्या विषाणू उपप्रकारांपासून संरक्षण मिळणार नाही असे तज्ज्ञ आवर्जून नमूद करीत आहेत. तिसरा डोस न घेतलेल्या लोकांकडून इतरांना धोका संभवत असल्याचे जगभरात अनेक अभ्यासांतून पुढे आले आहे. चीनमध्ये सध्या पुन्हा एकवार कोरोना महामारीची लाट आली असून तेथे राजधानी बीजिंगमध्ये लॉकडाऊनसदृश परिस्थिती ओढवली आहे. जगभरातील अनेक देशांनी चाचण्या आणि जेनोम सिक्वेन्सिंग थांबवल्याने जागतिक आरोग्य संघटनेकडे या संदर्भात आता तुलनेने फारच कमी माहिती जमा होते आहे. कोरोना विषाणू आता कसा फैलावतो आहे त्याकडे जगाने अशा तऱ्हेने डोळेझाक करणे धोक्याचे असल्याचे डब्ल्यूएचओने म्हटले आहे. महाराष्ट्रात मागील लाटांमध्ये देशातील अन्य राज्यांपेक्षा परिस्थिती बरीच हाताबाहेर गेली होती. तेव्हा आघाडी सरकार आतातरी वेळीच सुयोग्य उपाययोजना करेल, अशी आशा बाळगण्याखेरीज व स्वत:च जबाबदारीने सर्व प्रतिबंधात्मक खबरदारी घेण्याखेरीज जनतेच्या हातात काहीच नाही.**

# रायगड जिल्ह्यातील सिंचन प्रकल्प का रखडले?

### खबरबात
प्रकाश सोनवडेकर

रायगड जिल्ह्यातील काळ, बाळगंगा, कोंढाणे, सांबरकुंड यासारखे सिंचन प्रकल्प निरनिराळ्या कारणांनी रखडले आहेत. हे प्रकल्प पूर्ण झाल्यास जिल्ह्यातील पाणीटंचाईचा प्रश्न सुटू शकेल. त्याचबरोबर सिंचानाची समस्या काही प्रमाणात दूर होईल. त्यामुळे हे रखडलेले प्रकल्प पूर्ण व्हायला हवेत.


रायगड जिल्ह्यात दरवर्षी सरासरी साडेतीन हजार मिलीमीटर पाऊस पडतो, मात्र नियोजनाअभावी यातील बहुतांश पाणी समुद्रात आणि खाड्यांमध्ये वाहून जाते. उन्हाळ्यात जिल्ह्यातील अनेक गावांत पाणीटंचाई जाणवते. हंडाभर पाण्यासाठी महिलांना वणवण करावी लागते. सिंचन नसल्यामुळे खरीप हंगामाची शेती कमी आहे. सिंचन प्रकल्प रखडल्यामुळे रायगड जिल्ह्यात ही परिस्थिती निर्माण झाली आहे.

जिल्ह्यातील काळ कुंभे, बाळगंगा, कोंढाणे आणि सांबरकुंडसारख्या प्रकल्पांची कामे रखडली आहेत, तर पाली भुतवली, खार आंबोली, हेटवणे प्रकल्प पूर्ण झाले असले तरी कालव्यांची कामे पूर्ण झालेली नाहीत. त्यामुळे जिल्ह्यातील सिंचन क्षेत्रात वाढ होत नाही. बाळगंगा नदीवर बाळगंगा धरण बांधण्यात येत आहे. हा प्रकल्प गेली १० वर्षे रखडला आहे. नवी मुंबईत पाणीपुरवठा करण्यासाठी या प्रकल्पांची उभारणी करण्यात येणार होती. धरणाचे काम ७० टक्के पूर्ण झाले असून प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचा प्रश्न सुटलेला नाही. उल्हास नदीवरील कोंढाणे धरण प्रकल्प जलसंपदा विभागातील कथित घोटाळ्यामुळे अडचणीत आला होता. धरणाच्या उंची वाढवण्यावर बराच वादंग निर्माण झाला होता. आता सिडकोच्या माध्यमातून हा प्रकल्प मार्गी लावण्याचे प्रयत्न सुरू आहेत. नवी मुंबई विमानतळ प्रभावक्षेत्रात येणाऱ्या क्षेत्रासाठी या धरणातून पाणीपुरवठा करण्यात येणार होता.



माणगाव तालुक्यातील काळ नदीवर १९९८मध्ये काळ प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली. जलविद्युत प्रकल्पही या उभा करण्याचे निश्चित करण्यात आले. २००६मध्ये प्रकल्पाचे काम प्रत्यक्ष सुरू झाले. प्रकल्पाचे काम ७० टक्के काम पूर्ण झाले असले तरी उर्वरीत काम निधीअभावी रखडले आहे. प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचा प्रश्नही सुटलेला नाही. अलिबाग तालुक्यातील सांबरकुंड धरणाला चार दशकांपूर्वी मान्यता देण्यात आली होती, मात्र अद्यापही या प्रकल्पाचे काम सुरू होऊ शकलेले नाही. आता प्रकल्पाच्या साडेसातशे कोटींच्या सुधारित अंदाजपत्रकास शासनाने मान्यता दिली आहे. प्रकल्पासाठी भूसंपादनाचे काम सुरू झाले आहे, मात्र वनविभागाच्या तांत्रिक मान्यतेसाठी प्रकल्पाचे काम सध्या थांबले आहे.

प्रकल्प रखडण्याची अनेक करण आहेत. त्यापैकी मुख्य कारण आहे ज्यांच्या जमिनी जाणार आहेत त्यांना मिळणारा मोबदला आणि त्यांचे पुनर्वसन. पुनर्वसन योग्य पद्धतीने होत नसल्यामुळे शेतकरी आपल्या जमिनी देण्यात तयार होत नाहीत. अलिबाग तालुक्यातील रामराज ग्रामपंचायत हद्दीत खैरवाडी, जांबुळवाडी, सांबरकुंड वाडी या परिसरात सांबरकुंड धरण मध्यम प्रकल्प होत आहे. ४० वर्षांपूर्वी हा प्रकल्प मंजूर करण्यात आला असून अद्यापही रखडला होता. हा प्रकल्प झाल्यास अलिबाग तालुक्यातील पाणी समस्या सुटणार आहे. या प्रकल्पामुळे विस्थापित होत असलेल्या खैरवाडी, जांबुळवाडी



आणि सांबरकुंड वाडी यांच्या पुनर्वसनाबाबत गेल्या वर्षी जनसुनावणी खैरवाडी येथे घेण्यात आली. त्यात शेतकऱ्यांनी पुनर्वसनासंदर्भातच शंका उपस्थित केल्या होत्या.

पुनर्वसन आणि स्वेच्छा पुनर्वसनबाबत शेतकऱ्यांच्या मानात शंका आहे. स्वेच्छा पुनर्वसन काही शेतकऱ्यांना अमान्य आहे. गोठा, दुसरे घर याचा मोबदला दिला जात असला तरी जागाही देण्याबाबत शेतकऱ्यांनी म्हणणे मांडले आहे. यास प्रशासनाने नकार दिला आहे. शेतकऱ्यांनी मागितलेल्या रामराजमधील जागेत शेतकऱ्यांचे पुनर्वसन केले जाणार आहे. ज्यांना जागा नको त्यांना अतिरिक्त मोबदला देऊन त्यांचे



स्वेच्छा पुनर्वसन केले जाणार आहे. साधारण विस्थापित होत असलेल्या शेतकऱ्याला घराबाबत किमान सहा लाखांपासून १० लाखांपर्यंत मोबदला मिळणार आहे. यातही अडचणी आहेत. संबरकुंड प्रकल्प होणार म्हणून गेली ४० वर्षे सांगितले जात आहे. इतक्या वर्षांत अजूनही तेथे कामाची सुरुवातदेखील होऊ शकलेली नाही.

सांबरकुंड हे एक उदाहरण आहे. जे सिंचन प्रकल्प राखडले आहेत त्याचे मुख्य कारण पुनर्वसन आहे. भविष्यात रायगड जिल्ह्यात होणारी औद्योगिकी प्रगती, जिल्ह्यात वेगाने होत असलेले नागरीकीकरण याचा विचार करता जिल्ह्यातील सिंचन प्रकल्प लवकर पूर्ण करणे काळाची गरज आहे.

महाराष्ट्राचे जलसंपदामंत्री जयंत पाटील नुकतेच अलिबागला येऊन गेले. त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात एक आढावा बैठक घेतली. त्यात रायगड जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्प कामांचा आढावा घेतला. अलिबाग तालुक्यातील सांबरकुंड धरणाची एमपीव्ही व्हॅल्यू निश्चित करून वन विभागाचे पैसे भरले जातील. दोन ते तीन महिन्यांत ही प्रक्रिया पूर्ण होईल. त्यानंतर सांबरकुंड धरणाचे काम करण्यात येईल. बाळगंगा धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाचा प्रश्न आहे. याबाबत जलसंपदा व पुनर्वसन विभागाची मुंबईत बैठक घेऊन हा प्रश्न मार्गी लावण्यात येईल, अशी माहिती त्यांनी या वेळी दिली. जलसंपदामंत्र्यांनी प्रकल्पांचा आढावा घेतला आहे. त्यामुळे या रखडलेल्या प्रकल्पांच्या कामांना गती मिळेल, अशी अपेक्षा करूया; अन्यथा पुन्हा प्रतीक्षा करावी लागेल.



## बदलते तंत्रज्ञान



# पंख्याच्या किमतीत पोर्टेबल एसी उपलब्ध

सध्या उन्हाळा सुरू आहे. उन्हाचा सामना करण्यासाठी लोक पंखे, कुलर आणि एसीची सर्व्हिसिंग सुरू करतात किंवा पंखे, कुलर आणि एसी बदलतात. तुम्हालाही या समस्येपासून सुटका मिळवायची असेल तर बाजारात असे अनेक पोर्टेबल एसी आहेत, जे तुमचे काम सोपे करतील.

तुम्हाला जास्त पैसे खर्च करावे लागणार नाहीत किंवा इन्स्टॉलेशनबद्दल काळजी करावी लागणार नाही. आज आपण ॲमेझॉनवर उपलब्ध असलेल्या अशाच एका एअर कंडिशनरबद्दल जाणून घेणार आहोत, ज्याचा आकार बॉक्ससारखा आहे आणि तुम्ही ते कुठेही नेऊ शकता.

हे एक कमी किमतीचे टेबल एसी आहे. तुम्ही ते कुठेही ठेवू शकता. ऑफिसचे काम करताना टेबलावर किंवा झोपताना बेडजवळ. हे यूएसबी केबलद्वारे चालवले जाऊ शकते. तुम्ही हा पोर्टेबल एसी कमी, मध्यम किंवा उच्च क्षमतेवरवर चालवू शकता. हे पोर्टेबल एसी ह्युमिडिफायर आणि प्युरिफायर म्हणूनही काम करते.

याची कूलिंग रेंज खूप उत्कृष्ट आहे. हे खोलीत कुठेही बसवा. ते काही मिनिटांत संपूर्ण खोली थंड करते. याचा आकारही खूप लहान आहे. जर तुमच्या घरात जास्त जागा नसेल, तर हा तुमच्यासाठी सर्वोत्तम पर्याय ठरू शकतो. हे एसी बाजारात सहज उपलब्ध आहेत. जर तुम्हाला हे उत्पादन ऑनलाइन खरेदी करायचे असेल, तर ते ॲमेझॉनवरही खरेदी करता येईल. अनेक कंपन्यांनी हा पोर्टेबल एसी लॉन्च केला आहे. हा एसी तुम्हाला ८०० ते १५०० रुपयांमध्ये मिळेल.

# अशुद्ध बर्फाच्या वापराने आरोग्य धोक्यात!

खाऊगल्ल्या अथवा रस्त्यावरील खाद्यपदार्थ व ज्यूसचे स्टॉल हा प्रत्येक शहराचा अविभाज्य भाग झाला असून खाऊ गल्लीतील पदार्थांचा आस्वाद घेतला नाही असे नागरिक सापडणार नाही. मुंबईची हद्द थेट बदलापूर, विरार व खोपोली पर्यंत गेल्यामुळे घर व कामाच्या ठिकाणामधील अंतर वाढले त्यामुळे बाहेरील खाद्यपदार्थ खाणे ही अपरिहार्यता बनली आहे. मुंबईतील झायनोव्हा शाल्बी हॉस्पिटलच्या सर्वेक्षणानुसार उन्हाळ्यामध्ये बाहेरील खाद्य पदार्थ खाल्ल्यामुळे पोटांच्या विकारात वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे तसेच किडनीच्या विकारातही लक्षणीय वाढ झाली आहे. खाद्यपदार्थ खाल्ल्यावर तेथे उपलब्ध असलेले निकृष्ट दर्जाचे ज्युस नागरिकांचे पोट बिघडविण्यास कारणीभूत ठरत आहेत.

### प्रासंगिक

याबाबत माहिती देताना झायनोव्हा शाल्बी हॉस्पिटलचे इंटर्नल मेडिसिन तज्ञ व फिजिशियन डॉ.चेतन वेलानी सांगतात, गेल्या १५ दिवसांत हगवण व जुलाबाचा त्रास असलेल्या पेशंटमध्ये ३० ते ४० टक्के वाढ झाली असून झायनोव्हा शाल्बी हॉस्पिटलने केलेल्या अंतर्गत सर्वेक्षणानुसार या आजारासाठी बाहेरील खाद्यपदार्थ कारणीभूत ठरत आहेत.आपण शहरात कामानिमित्त फिरत असताना अनेकदा फुटपाथवर बर्फ ठेवून त्यावर बारदान (पोते) झाकून ठेवलेले पाहतो, पण हाच बर्फ आपण वेगवेगळ्या सरबत व पदार्थामध्ये सेवन करीत असतो, मात्र या बर्फाचा दर्जा तपासला गेला आहे की नाही याची नागरिकांना कल्पना नसते, उसाचे रस विक्रेते, विविध रंग टाकून आकर्षक बर्फ गोळा विकणारे, फळांचा रस विकणारे ज्यूस सेंटर, उन्हाळ्यात जागोजागी माठ घेऊन लस्सी आणि ताक विकणारे हा बर्फ घेत असतात. त्याशिवाय काही उपाहारगृहांमध्ये बर्फाचे वितरण केले जाते. याशिवाय मोठया हॉटेल्समधील ज्यूसमध्येही हाच बर्फ असतो, या शुद्ध बर्फातून ई-कोलाय, कॉलीफॉर्म, स्टॅफिलोकोकस ऑरिअस अशा हगवण व जुलाबाला कारणीभूत ठरणाऱ्या जिवाणूंचा संसर्ग होत असतो, दूषित पाण्याने जे रोग होतात, तेच रोग उघडय़ावरील बर्फ खाल्ल्याने होतात. या अशुद्ध बर्फाच्या सेवनाने विषमज्वर, कॉलरा, अन्नातून विषबाधा, मेटल पॉइझनिंग, अमेबिया, उलटय़ा, कावीळ, अतिसार, हगवण असे आजार होऊ शकतात.



उन्हाळ्यामध्ये हवेतील आर्द्रता कमी होते व कोरडेपणा वाढतो. त्यामुळे आपल्या शरीरातून घाम येण्याचं प्रमाण वाढतं व शरीरातील पाणी पातळी कमी होते. पाण्याचा समतोल ठेवण्याची जबाबदारी किडनीवर असल्याने त्याचा विपरित परिणाम सर्वसाधारण किडनीवर होत असतो. मार्च ते जून महिन्याच्या अखेरीपर्यंत मुतखड्याच्या पेशंटमध्ये ३० ते ४० टक्क्यांनी वाढ होते. मुतखडा टाळण्यासाठी पाणी हा सर्वांत लाभदायी पेय पदार्थ आहे. दिवसभरात ८-१० ग्लास पाणी प्यायल्याने साखर, सोडियम तसेच पेय पदार्थांमधील बाकीच्या घटकांचे मूत्रपिंडातून उत्सर्जन होण्यास मदत होते, ज्यामुळे मुतखडा होण्याचे प्रमाण कमी होते, अशी माहिती झायनोव्हा शाल्बी हॉस्पिटलचे इंटर्नल मेडिसिन तज्ञ व फिजिशियन डॉ. चेतन वेलानी यांनी दिली.




### क्लिक...क्लिक...!



**उत्तरकाशी (उत्तराखंड) : सुधागड तालुक्यातील पोटलज खुर्द येथील प्रसिद्ध गिर्यारोहक मॅकमोहन हुले यांनी नुकतीच हिमालयातील १५ हजारांहून अधिक फूट माचाधारेवर यशस्वी चढाई करून रायगड जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. परदेशातील गिर्यारोहकांनीदेखील हुले यांच्या चढाई कौशल्याचे कौतुक केले.**

## आरोग्य प्रहर



# जलदगतीने चालणे फायदेशीर

चालणे हा उत्तम व्यायाम आहे. दररोज नियमित चालणाऱ्यांची आरोग्याविषयीच्या विविध समस्यांपासून सुटका होते. चालणे ही सुदृढ शरीराची गुरूकिल्ली आहे, असे डॉक्टरही सांगतात. चालताना वेग महत्त्वाचा असतो. जलदगतीने चालणाऱ्यांना दीर्घायुष्य लाभते, असे संशोधन ब्रिटनमधील वैद्यकीय तज्ज्ञांनी केले आहे.

हल्ली हृदयविकार, रक्तदाब आणि वजन वाढणे या समस्यांमुळे चालणाऱ्यांची संख्या वाढलेली आहे. सकाळी लवकर उठून अनेक जण तासभर चालून येतात त्यानंतर आपल्या दिनक्रमाला सुरुवात करतात. रात्री जेवणानंतरही अनेक जण शतपावली करताना दिसतात, मात्र आपल्या चालण्याचा वेगही महत्त्वाचा असतो हे अनेकांना माहीत नसते. संथगतीने किंवा रमतगमत चालणे याला महत्त्व नसते. तुम्ही जलदगतीने चालत असाल तर त्याने व्यायाम होतो आणि तुमचे आयुर्मान वाढू शकते, असे संशोधन ब्रिटनमधील लिसेस्टर विद्यापीठाच्या मधुमेह संशोधन केंद्राने केले आहे.

जलदगतीने चालणाऱ्यांची टेलिमीअर्स तपासणी केली असता त्यांचे आयुर्मान जास्त असल्याचे दिसून येत आहे. टेलिमीअर्स ही एक रक्तचाचणी आहे, त्याच्या तपासणीतून व्यक्तीचे जैविक वय समजू शकते. लिसेस्टर विद्यापीठाच्या संशोधकांनी ब्रिटनमधील ५० वर्षांखालील काही जणांच्या वैद्यकीय अहवालाचा अभ्यास केला, त्यानंतर हा निष्कर्ष काढला. जलदगतीने चालणाऱ्यांचे जैविक वय १२ ते १६ वर्षांनी वाढल्याचे टेलिमीअर्स चाचण्यांद्वारे दिसून आले. तसेच संथगतीने चालणाऱ्यांपेक्षा जलदगतीने चालणाऱ्यांना हृदयविकाराचा धोका ३४ टक्क्यांनी कमी असल्याचे या संशोधनात दिसून आले. हृदयविकारासह रक्तदाब, मधुमेह तसेच मानसिक विकारही जलदगतीने चालणाऱ्यांना कमी असल्याचे या संशोधनात दिसून आले.

# खालापुरात पाणीटंचाई

## मुंगूरपालन तलावामुळे पेयजल योजना बंद




(छाया : विनायक माडपे)

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंगूरपालन तलावातील घाणपाण्यामुळे पाताळगंगा नदी प्रदुषित झाली असून, या नदीवर ३० लाख रुपये खर्चून खालापूर शहरासाठी सुरू करण्यात आलेली पेयजल बंद पडली आहे.

पिण्याच्या पाणी समस्या खालापूर शहरातील नागरिकांच्या पाचवीला पुजलेली आहे. तालुक्याचे ठिकाण असूनदेखील कित्येक वर्षे येथील नागरिकांना पिण्याचे शुद्ध पाणी मिळत नाही. त्यामुळे खालापूरातील अनेक कुटुंबे खोपोली, पनवेल याठिकाणी स्थलांतरित झाली आहेत. खालापूर शहरासाठी कलोते धरणालगत पाझर विहिरीवर पाणी योजना आहे. या पाझर विहिरीपासून खालापूर शहरापर्यंत जलवाहिनी टाकण्यात आली असून, या जलवाहिनीला कुठे गळती तर पंपात बिघाड ठरलेला असतो. खालापूर शहरासाठी पर्यायी पाणी योजना सावरोली पुलाजवळ पाताळगंगा नदीवर २० डिसेंबर २०१९ ला कार्यान्वित करण्यात आली. पाताळगंगा नदीतील पाणी विहिरीत साठवून पंपाद्वारे ते पाणी खालापुरातील जलकुंभांत आल्यानंतर शुद्धीकरण करून नागरिकांपर्यंत पोहोचवण्याची व्यवस्था या पर्यायी योजनेत होती. मात्र अतिशय दूषित आणि दुर्गंधीयुक्त पाणी येत असल्याने ही पेयजल योजना बंद पडली आहे. ज्या ठिकाणी विहिरीतून पाणी उचलले जाते, तिथे वाहत येणारे पातळगंगा नदीचे पाणी अतिशय दूषित आणि दुर्गंधीयुक्त आहे. येथून काही अंतरावर महड येथे असलेल्या मुंगूर माशांच्या तलावातील अतिशय घाणेरडे पाणी पातळगंगा नदीत सोडण्यात येत असल्याने, जलप्रवाह दूषित होत आहे. शिवाय नदीकिनारी टाकण्यात येत असणारी पोल्ट्रीतील घाण पाण्याबरोबर वाहत येत असून, त्यामुळे जलस्त्रोत प्रदूषित होत आहे. मत्स्य विभागाकडे तक्रारींचा पाऊस पडूनदेखील या विभागाचे अधिकारी कारवाईत कोरडेपणा दाखवत आहेत.

**मुंगूर पालन तलावातील पाणी अतिशय घाण दुर्गंधीयुक्त असून ते थेट नदीत सोडले जाते. त्यामुळे खालापूर पाणी योजना ठप्प असून शहरात एक तर कधी दोन दिवसाआड पाणी मिळते.**

**–शिवलिंग वाघरे, नागरिक,खालापूर**

**नगरपंचायतीने महड येथील मुंगूर पालन तलावबाबत लेखी तक्रार मत्स्य व्यवसाय विकास विभागाकडे केली आहे.**

**–रश्मी चव्हाण, मुख्याधिकारी, नगरपंचायत खालापूर**

## महाड एसटी आगाराची बस पूर्वपदावर

### कर्मचारी कामावर रूजू झाल्याने लांब पल्ल्याचा प्रवासही सुरू



(छाया : महेश शिंदे)

**महाड : प्रतिनिधी**

एसटी कर्मचाऱ्यांनी पुकारलेला संप संपुष्टात आला असून कर्मचारी कामावर रुजू होत आहेत. त्यामुळे महाड आगाराची बस आता पूर्वपदावर आली असून ग्रामीण आणि लांब पल्ल्याच्या बस फेऱ्या सुरू झाल्या आहेत. एसटी फेऱ्या सुरू झाल्याने प्रवाशांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

आपल्या विविध मागण्यांसाठी एसटी महामंडळाचे कर्मचारी बेमुदत संपावर गेले होते. त्यामुळे एसटी प्रवाशांचे मात्र मोठे हाल झाले होते. न्यायालयाच्या निर्णयानंतर बहुतांश कर्मचारी पुन्हा कामावर रुजू झाले आहेत. त्यामुळे नागरिक आणि प्रवाशांना मोठा दिलासा निर्माण झाला आहे. महाड आगारातील ग्रामीण तसेच लांब पल्ल्यांच्या फेऱ्या पूर्वपदावर येऊ लागल्या आहेत. यामुळे ग्रामीण भागातील प्रवाशांना तसेच विद्यार्थ्यांना एसटी बसचा प्रवास करणे सोपे झाले आहे.

महाड आगारातून मुंबई, पुणे, नाशिक, जळगाव, कल्याण आदी ठिकाणी लांब पल्ल्याच्या गाड्या धावत असतात तर तालुक्यातील बहुतांश गावात एसटी बस जाते. मात्र कर्मचाऱ्यांच्या संपामुळे या सर्व एसटी गाड्या बंद झाल्या होत्या. कर्मचारी कामावर हजर झाल्यानंतर प्रवाशांची पावले महाड आगाराकडे वळली आहेत. महाडपासून मुंबई, पुणे, जळगाव, बोरीवली, ठाणे, आदी ठिकाणी जाणाऱ्या आणि येणाऱ्या प्रवाशांची गर्दी वाढू लागली आहे. महाड आगारातील सुमारे पन्नास चालक, साठ वाहक व अन्य कर्मचारी कामावर हजर झाले आहेत. ज्या कर्मचाऱ्यांवर संप काळात कारवाई झाली होती त्यांची कागदोपत्री कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर ते कर्मचारीदेखील हजर होतील, असे एसटी आगारातील सूत्रांनी सांगितले.

एसटी संप मिटल्याने महाड आगार लांब पल्ल्यांच्या बसेसमुळे बोलके झाले आहे. महाड आगारात अन्य आगारातील बसेसदेखील येवू लागल्याने प्रवाशांची गर्दी होऊ लागली आहे. आगारातील दुकानदार आणि फळ विक्रेत्यांनीदेखील समाधान व्यक्त केले आहे.

## प्रधानमंत्री पीक विमा योजनेसंबंधी मुरूडमध्ये शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**मुरूड : प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री पीक विमा योजनेसंबधी मुरूड तालुक्यातील सात ग्रामपंचायतीमध्ये पीपीटीद्वारे शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आल्याची माहिती पंचायत समितीमधील समन्वयक मंदार गायकर यांनी दिली.

प्रधानमंत्री पीक विमा योजनांतर्गत मुरूड तालुक्यातील काकळघर, काशीद, कोर्लई, भोईघर, साळाव, विहूर आणि नांदगाव या सात ग्रामपंचायतींमध्ये संगणकाद्वारे गारपीट, वादळ, चक्रीवादळ व अवकाळी पाऊस यामुळे पिकांची हानी झाल्यास विमा कंपनीकडून आर्थिक मदत मिळू शकते. हंगामातील प्रतिकुल परिस्थिती, पीक काढणी पश्चात नुकसान भरपाई, स्थानिक आपत्ती व हंगामाच्या अखेरीस सरासरी उत्पन्नाच्या आधारे नुकसान भरपाई निश्चित करणे आदी बाबींची तपशीलवार माहिती या वेळी शेतकऱ्यांना देऊन प्रबोधन करण्यात आले.

नैसर्गीक आपत्तीने गेल्या ३–४ वर्षांपासून कित्येक शेतकऱ्यांचा तोंडी आलेला घास पळवला आहे. या पार्श्वभूमीवर शेतकरी वर्गाचे प्रबोधन करणे गरजेचे आहे. मात्र केलेल्या पंचनाम्याच्या आधारावर विमा कंपनीने वेळेवर नुकसान भरपाई देण्याची व्यवस्था करावी, अशी अपेक्षा खार अंबोलीचे शेतकरी मनोज कमाने यांनी व्यक्त केली. तर अल्प भूधारक शेतकरी भात पीक विमा काढण्यासाठी पुढे येत नसल्याची व्यथा या वेळी संजय बागुल (नवी वाडी) यांनी मांडली.

## भालमधून अल्पवयीन मुलीला नेले पळवून

**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील भाल गावातून अल्पवयीन मुलीला अज्ञातांनी पळवून नेल्याची घटना घडली आहे. या बाबत पीडित मुलीच्या वडिलांनी (रा. भाल, पो. वढाव, ता. पेण) वडखळ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

पीडित मुलगी (वय १६) अल्पवयीन असून, तिच्या अज्ञानपणाचा फायदा घेऊन अज्ञात इसमाने फुस लावून पळवून नेले असल्याचे या तक्रारीत म्हटले आहे. या प्रकरणी वडखळ पोलीस ठाण्यात अज्ञात इसमा विरोधात भादवि. कलम ३६३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस हवालदार चवरकर करीत आहेत.

## किरकोळ वादातून जीवे ठार मारल्याप्रकरणी आरोपीस जन्मठेप

### माणगाव सत्र न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय

**माणगाव : प्रतिनिधी**

किरकोळ वादातून जीवे ठार मारल्याप्रकरणी आरोपीस माणगाव सत्र न्यायालयाने बुधवारी (दि. २७) जन्मठेप व २० हजार रुपयांचा दंड व दंड न भरल्यास दोन महिने साध्या कारावासाची शिक्षा ठोठावली. सदरची घटना महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बोरगाव येथे घडली होती.

आरोपी महादेव गजानन पाटोळे (रा. केरेवाडी, ता. कवठेमहाकाळ, जि. सांगली) आणि मयत साहेबराव जयवंत चव्हाण उर्फ नाना हे गणपत निकम यांच्या बोरगाव येथील खडी क्रिशरवर ड्रील मारण्याचे काम करत होते. ते कॉरीवर बोरिंग गाडीतच राहून जेवण करून तेथेच झोपायचे. आरोपी महादेव पाटोळे व मयत साहेबराव चव्हाण यांच्यात कामावरून वाद होवून आरोपी याने साहेबराव चव्हाण यांना स्टीलच्या पाईपने मारहाण करून त्यांच्या डोक्यात दगड घालून जिवे ठार मारले.

या घटनेची फिर्याद महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात दाखल झाली. या गुन्ह्याच्या तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक आबासाहेब पाटील यांनी केला व आरोपी विरुद्ध न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले. सदर खटल्याची सुनावणी अतिरीक्त सहजिल्हा न्यायाधीश यांच्या समोर झाली. सदर गुन्ह्यात साक्षीदारांच्या साक्ष व वैद्यकीय तसेच तांत्रिक पुरावा महत्त्वाचा ठरला. सदर खटल्यामध्ये अ‍ॅड. जितेंद्र म्हात्रे यांनी सरकार पक्षाच्या वतीने काम पहिले व कोर्टासमोर प्रभावीपणे युक्तिवाद करून महत्त्वाचे न्यायनिर्णय दाखल केले. सदर केसच्या सुनावणी दरम्यान पैरवी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक यु. एल. धुमास्कर, पोलीस हवालदार छाया कोपनर, शशिकांत कासार, पोलीस हवालदार शशिकांत गोविलकर, शिपाई सुनील गोळे, सोमनाथ ढाकणे यांनी सहकार्य केले. न्या. टी. एम. जहांगिरदार यांनी आरोपीला दोषी ठरवून बुधवारी आरोपी महादेव गजानन पाटोळे याला भादविक ३०२ अन्वये जन्मठेपेची शिक्षा व २०हजार रुपये दंड व दंड न भरल्यास दोन महिने साध्या कारावासाची शिक्षा ठोठावली.

## पेणमध्ये चोरी करण्याच्या प्रयत्नात असलेल्या चोरट्यास अटक

**पेण : प्रतिनिधी**

शहरातील आर. के. वाईन शॉप या दुकानात गुरुवारी (दि. २८) पहाटेच्या सुमारास चोरी करण्याचा प्रयत्नात असलेल्या सूरज सरबजित सिंग (रा. कुंभारआळी, पेण) या चोरट्यास पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याचा साथिदार सुंदर मोरे हा फरार झाला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

गुरुवार पहाटेच्या सुमारास दोन चोरटे शहरातील आर. के. वाईन शॉपमध्ये चोरी करण्याच्या तयारीत होते. ते समोरील दुकानात काम करीत असलेल्या कारागिराच्या लक्षात आले त्याने त्याची माहिती पेण पोलिसांना दिली. पोलिसांनी आर. के. वाईन शॉपमध्ये चोरी करण्याच्या प्रयत्नात असलेल्या सूरज सरबजित सिंग याला ताब्यात घेतले असून यातील दुसरा आरोपी सुंदर मोरे हा फरार झाला आहे.

या प्रकरणी पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास हवालदार संतोष जाधव करीत आहोत. आरोपी सूरज सरबजित सिंग याला ३० तारखेपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.



(छाया : अनिस मनियार)

## मोऱ्यांच्या कामामुळे मुरूडमधील रस्त्याची कामे थंडावली

**मुरूड : प्रतिनिधी**

नगरविकास खात्याकडून निधी प्राप्त झाल्यानंतर मुरूडमधील रस्त्यांच्या कामांना वेग आला होता, मात्र शहरातील नवाबकालीन गटारे व मोऱ्यांची कामे सुरू झाल्याने सध्या रस्त्याची कामे थंडावली आहेत.

मुरूड शहरातील रस्त्यांच्या कामासाठी नगर परिषदेला नगरविकास खात्याकडून पाच कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. नगर परिषदेचे मुख्याधिकारी पंकज भुसे यांनी तातडीने तांत्रिक मान्यता व टेंडर प्रक्रिया पूर्ण केल्यामुळे रस्त्यांच्या कामांना वेग आला होता. मात्र तत्पुर्वी शहरातील नवाबकालीन गटारे व मोऱ्यांची कामे करणे आवश्यक होते. तसे न झाल्याने सध्या मुरूडमधील रस्त्याची सध्या कामे थांबली आहेत.

मुरुड शहरातील सार्वजनिक वाचनालय, शिवानी मेडिकल व अन्य ठिकाणी मोऱ्यांची कामे सुरू आहेत. मोऱ्याची कामे पूर्ण होताच पुन्हा रस्त्यांच्या कामाला वेग प्राप्त होणार आहे. एक मोरी काम पूर्ण करावयास किमान २० दिवसापेक्षा जास्त कालावधी लागत असल्याने पावसाअगोदर रस्त्याची कामे पूर्ण व्हावीत अशी अपेक्षा शहरातील नागरिक व्यक्त करीत आहेत.



(छाया : संजय करडे)

## नदी संवर्धन योजनेतंर्गत पेणच्या 'भोगावती'ला प्रदूषणमुक्त करण्याची मागणी



**पेण : प्रतिनिधी**

शहरातून जाणाऱ्या भोगावती नदीपात्रात जलपर्णी मोठ्या प्रमाणात पसरली आहे. याशिवाय अन्य प्रकारची घाणही साचलेली असल्याने भोगावती नदीचा श्वास कोंडला आहे. केंद्र सरकारच्या नदी संवर्धन योजनेच्या माध्यमातून संरक्षक भिंत बांधून पाण्याचे शुद्धीकरण केल्यास नदी प्रदूषणमुक्त होईल, अशी प्रतिक्रिया नागरिकांतून उमटताहेत.

पेण शहरातून जाणारी भोगावती नदी पुढे अंतोरे खाडीपर्यंत वाहत जाऊन समुद्राला मिळते. या नदीपात्रातून अनेक वर्षांपासून पेण शहराला पाणीपुरवठा होत आहे. मात्र, तालुक्यातील अनेक गावांचे सांडपाणी, प्लास्टिक पिशव्या, खराब झालेल्या गणपतीचे सुट्टे भाग, जनावरांचे मलमूत्र, तसेच इतर कचऱ्यांचा ढीग टाकले जात असल्यामुळे भोगावती नदी प्रदूषित झाली आहे. तसेच सातत्याने नदी पात्रात जलपर्णी वाढत आहे. या दूषित पाण्यामुळे नागरिकांसह पशू–पक्ष्यांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे.

भोगावती नदी स्वच्छ आणि सुंदर राहण्यासाठी अनेक सामाजिक संघटनांनी एकत्र येऊन वारंवार स्वच्छता मोहीम राबवली. नगरपालिकेच्या माध्यमातूनही 'माझी वसुंधरा' या अभियाना अंतर्गत दरवर्षी स्वच्छता मोहीम राबवून आरोग्य विभागातील कर्मचारी नदीतील जलपर्णी काढतात. मात्र सध्या नदी प्रदुषित झाली आहे. जलपर्णीने नदीला विळखा घातला आहे. याच पाण्यातून शहराला पाणीपुरवठा होत असल्याने नदी संवर्धन होणे गरजेचे बनले आहे.

केंद्र सरकारच्या नदी संवर्धन योजने अंतर्गत अनेक गावांना स्वच्छ पाणीपुरवठा केला जात आहे, तसेच केंद्र सरकारने 'हर घर हर जल' ही योजना सुरू केली आहे. त्याच धर्तीवर पेणची भोगावती नदी वाचवावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे. नदी संवर्धन मोहीमेत सर्वांनी सहभागी होऊन आपल्या जवळपास असलेल्या जलस्त्रोतांचे संवर्धन करावे व नगर परिषदेस सहकार्य करावे, असे आवाहन पेण नगर परिषदेतर्फे करण्यात आले आहे.

**भोगावती नदीतील पाण्याचे शुद्धीकरण करूनच शहरात पुरवले जाते. दर महिन्याच्या सुरुवातीला पाण्याचे नमुने तपासणीसाठी पाठवले जातात. मात्र काही नागरिक नदीत कचरा टाकत असल्याने मोठ्या प्रमाणावर झालेल्या जलपर्णीमुळे पाणी अशुध्द झाले आहे. येत्या दोन दिवसात पुन्हा नदी स्वच्छता मोहीम राबिवण्यात येईल.**

**–शिवाजी चव्हाण, आरोग्य निरीक्षक, पेण नगर परिषद**

## कर्जतमध्ये आदिवासींचा आक्रोश मोर्चा



**कर्जत : प्रतिनिधी, बातमीदार**

जागृत कष्टकरी संघटनेने विविध मागण्यांसाठी कर्जत तहसील कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढून मागण्यांचे निवेदन तहसीलदार विक्रम देशमुख यांना दिले होते. तहसीलदार विक्रम देशमुख यांनी निवेदन स्वीकारुन आदिवासी बांधवांच्या समस्या सोडविण्यासाठी केलेल्या उपाययोजनांची माहिती दिली.

कर्जतच्या आमराई पुलापासून निघालेल्या या आक्रोश मोर्चात जागृत कष्टकरी संघटनेच्या कार्याध्यक्षा नॅन्सी गायकवाड, अध्यक्ष केशव वाघमारे, सचिव अनिल सोनावणे, खजिनदार वसंत पवार, कर्जत तालुका अध्यक्ष रमेश सट्टु आगज, सचिव सदानंद आंबो शिंगवा, खजिनदार किसन रावजी पादिर तसेच सुशिला भोई, लक्ष्मी हिलम, जाई वाघमारे, सिता पवार, शकुंतला वाघमारे, कृष्णा गारे, लता दरवडा, कान्हु दरवडा, मारुती वाघमारे, अंकुश पवार, नामदेव निरगुडा, कृष्णा वाघमारे, किसन कांबडी आदिंसह आदिवासी बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

कर्जत तालुक्यातील जवळपास १३०० कुटुंबाची अतिक्रमणे नियमाकुल करुन त्याच्या नोंदी सातबाऱ्यावर घेतलेल्या असून ग्रामपंचायतीच्या असेसमेंट उताऱ्यावरदेखील त्यांच्या नोंदी घेतलेल्या आहेत. तसेच खरवंडी व वंजारवाडी येथील आदिवासी कुटुंबांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न लवकरच सुटणार असून या दोन्ही ठिकाणच्या पाणी योजना मंजुर झालेल्या आहेत. तात्पुरता पाणी टंचाईचा प्रश्न दोन दिवसात सोडवला जाईल, असे आश्वासन तहसीलदार देशमुख यांनी या वेळी दिले. कर्जतच्या पोलीस निरीक्षक सुवर्णा पत्की यांनी सहकाऱ्यांसह मोर्चाच्या सुरक्षेची जबाबदारी पार पाडली.

**जागृत कष्टकरी संघटनेच्या निवेदनातील मागण्या कातकरी उत्थान अभियानांतर्गत सोडविण्याचे काम अगोदरपासूनच सुरू आहे. जे प्रलंबित विषय आहेत त्यावर तात्काळ निकाली काढण्यात येतील.**

**–विक्रम देशमुख, तहसीलदार, कर्जत**



**कुळगांव बदलापूर नगरपरिषद**

जा.क्र. : कुबनप/साबां/३६०६/२०२२–२३ दिनांक :– २८/०४/२०२२

**जाहीर ई–निविदा सूचना क्र. १३/२०२२–२३**

कुळगांव बदलापूर नगरपरिषदेच्या बांधकाम विभागामार्फत नाविन्यपुर्ण योजने अंतर्गत कुळगांव बदलापूर नगरपरिषद हद्दीमध्ये वॉ.क्र. ४ मध्ये बदलापूर जिमखाना यामध्ये आसन व्यवस्था तसेच मैदान बनविणे व इतर साधन सामुग्री पुरविणे रु. २९९,७९,९९४/– प्रस्तावित काम करणेसाठी महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून टक्केवारी दराच्या ई–निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई–निविदा संच विक्री व स्विकृतीचा कालावधी दि. २९/०४/२०२२ ते दि. १३/०५/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत आहे व सदर निविदा दि. १७/०५/२०२२ रोजी दुपारी ४:०० नंतर उघडण्यात येतील.

निविदेबाबतचा सविस्तर तपशील नगरपरिषदेच्या http://kbmc.gov.in तसेच शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर व नगरपरिषदेच्या सूचना फलकावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

**सही/–**
**(योगेश गोडसे)**
**मुख्याधिकारी तथा प्रशासक**
**कुळगांव बदलापूर नगरपरिषद**

# जेएनपीए ठरले देशातील सर्वोत्तम बंदर

## देशाच्या निर्यात वाढीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान

**उरण : वार्ताहर**

जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण हे देशातील प्रमुख कंटेनर बंदर आहे. लॉजिस्टिक कामगिरी निर्देशांकानुसार भारतातील सर्वोत्तम कामगिरी करणारे हे बंदर ठरले आहे. लॉजिस्टिक कामगिरीवर आधारित निर्देशांक सूची नुकतीच जाहीर करण्यात आली. यामध्ये जेएनपीएला सर्वाधिक ८४.६१ अंक प्राप्त झाले व जेएनपीए भारतातील प्रमुख बंदरांच्या यादीत शिर्षस्थानी विराजमान झाले.

या सूचीमध्ये मुंद्रा (८४.१६), पिपावाव (८१.५२), दिल्ली विमानतळ (८१.२७) आणि काकीनाडा (७७.२२) अनुक्रमे दुसऱ्या, तिसऱ्या, चौथ्या व पाचव्या स्थानी राहिले. देशातील सर्व प्रमुख बंदरांसाठी समान असलेल्या ११ पॅरामीटर्सच्या आधारे कामगिरीची क्रमवारी ठरवली जाते. हे पॅरामीटर्स याप्रमाणे–लॉजिस्टिक वेळ (तासांमध्ये), लॉजिस्टिक खर्चाच्या किती टक्के विलंब खर्च, सीमाशुल्क आणि कागदपत्रांची सुलभता एक–दहाच्या स्केलवर मोजमाप, एकूण लॉजिस्टिक खर्चाच्या किती टक्के कस्टम क्लिअरिंगची शुल्क, लॉजिस्टिक खर्चाच्या किती टक्के स्पीड मनी, व्यवसायात अडथळा किंवा विलंब म्हणून एक–दहाच्या स्केलवर भ्रष्टाचाराचे मोजमाप, त्यात भ्रष्टाचार निर्मूलनाचे उपाय विचारात घेतले गेले, विविध टोळ्यांकडून होणारा त्रास, चोरी/गळती इत्यादिचे एक–दहाच्या स्केलवर मोजमाप, माल



उतरवण्यापासून स्टोरेज यार्डमधील सीमा शुल्क तपासणीपर्यंत लागणारा वेळ, स्टोरेज यार्डमधील सीमाशुल्क तपासणीपासून आयातदारांसाठी वस्तू शेवटी बंदराबाहेर गेल्यापर्यंत लागणारा वेळ, सीबीआयसी अधिकार्यांकडून मालाच्या तपासणीसाठी बंदरातून माल घेऊन जाण्यासाठी लागणारा वेळ, सीबीआयसी अधिकार्यांची तपासणी पूर्ण होण्यापासून ते जहाजावर माल चढविण्यासाठी लागणारा वेळ आदिंचा समावेश होता.

जेएनपीए बंदराच्या उत्कृष्ट कामगिरी विषयी बोलताना जेएनपीएचे अध्यक्ष संजय सेठी म्हणाले, जेएनपीएने अखंड कनेक्टिव्हिटीसोबतच संपूर्णपणे स्वयंचलित आणि एकात्मिक कंटेनर सेवांसह प्रक्रिया सुलभ आणि सुव्यवस्थित करण्यासाठी व त्याचबरोबर व्यवहारामध्ये संपूर्ण पारदर्शकता आणि व्यवसाय सुलभ करता यावा यासाठी अनेक उपाययोजना केल्या आहेत. जेएनपीएने व्यवसाय वृद्धी व सुलभतेसाठी तीन स्तरीय दृष्टिकोणाचा अवलंब केला आहेत. पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा, प्रक्रिया सुलभ करणे आणि क्रीयाकलापांचे डिजिटायझेशन करून व्यवसाय सुलभतेला प्रोत्साहन देण्यासाठी विविध उपक्रम हाती घेतले. या अंतर्गत जेएनपीएने सेंट्रलाइज्ड पार्किंग प्लाझाचा विकास, बंदर परिसरातील रस्त्यांचे रुंदीकरण, चौथ्या कंटेनर टर्मिनलच्या फेज दोनचा विकास, स्कॅनर बसवणे, कोस्टल बर्थचा विकास, एकात्मिक कॉमन रेल यार्ड सुविधेचा विकास, डायरेक्ट पोर्ट डिलिव्हरी, डायरेक्ट पोर्ट एंट्री, आयटीआरएचओ, आरएफआयडी आधारित टर्मिनल गेट व्यवहार, कंटेनर ट्रॅकिंग, जेएनपीए मोबाइल ॲप, ई–डिलिव्हरी ऑर्डर, पीसीएस सिस्टमचे अपग्रेडेशन आदी उपायांमुळे जेएनपीएने २०२१ या वर्षामध्ये एकूण ५.६३ दशलक्ष टीईयूची कंटेनर यशस्वीपणे हाताळणी केली. भारतातील कोणत्याही बंदराद्वारे हाताळली गेलेली ही सर्वोच्च आयात–निर्यात कंटेनर वाहतूक आहे. जेएनपीए देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी वचनबद्ध आहे आणि व्यवसाय सुलभरित्या करता यावा करण्यासाठी सर्वोत्तम सुविधा प्रदान करून जागतिक मूल्य पुरवठा साखळीचे नेतृत्व करत असल्याचेही ते म्हणाले.

**कर्मचारी,भागधारक, ग्राहक यांचे हे श्रेय : संजय सेठी**

जेएनपीए बंदराच्या उत्कृष्ट कामगिरीविषयी बोलताना अध्यक्ष संजय सेठी म्हणाले, आमचे सर्व कर्मचारी, भागधारक आणि ग्राहक यांचे हे श्रेय आहे. त्यांच्या सहकार्यामुळेच जेएनपीएने देशातील सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे बंदर बनून आणखी एक मैलाचा दगड गाठला आहे. लॉजिस्टिक खर्चात बचत करण्यासाठी, जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी आणि आयात–निर्यात समुदायासाठी वेळेची बचत करण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करीत आहोत.

(छाया : दिनेश पवार)



# उरणमध्ये पोलिसांची रंगीत तालीम

**उरण : वार्ताहर**

सहाय्यक पोलीस आयुक्त धनाजी शिरसागर (पोर्ट विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली व उपस्थितीत बुधवार (दि. २७) सायंकाळी एसटी स्टँड चारफाटा उरण येथे जातीय दंगा काबू प्रतिबंधक योजनेची रंगीत तालीम पोलिसांकडून घेण्यात आली

दंगा काबू प्रतिबंधक योजनेमध्ये उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक सुनील पाटील, दोन निरीक्षक, सहा सहाय्यक निरीक्षक/निरीक्षक, २५ अंमलदार, न्हावाशेवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक मधुकर भटे, एक निरीक्षक, एक सहाय्यक निरीक्षक/उपनिरीक्षक, १० अंमलदार, मोरा सागरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक अभिजित मोहिते, एक निरीक्षक, एक सहाय्यक निरीक्षक/उपनिरीक्षक, पाच अंमलदार यांनी सहभाग घेतला होता. त्याचप्रमाणे द्रोणागिरी फायर ब्रिगेड व उरण इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय यांचे अधिकारी व कर्मचारी यांनी सहभाग घेतला होता. अशाप्रकारे जातीय दंगा काबू प्रतिबंधक तालीम यशस्वीरित्या पार पडली.



# कोरोना महामारीनंतर तणावमुक्त मातृत्व एक नवीन समस्या!

**नवी मुंबई : बातमीदार**

कोरोना महामारीनंतर अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. कौटुंबिक समस्यांमध्येही मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. दरम्यान गर्भधारणेदरम्यान योग्य काळजी न मिळाल्याने भारतात दरवर्षी ४५ हजारहून अधिक महिलांना आपला जीव गमवावा लागतो. शहरांमध्ये उशिरा मातृत्व ही एक जटिल समस्या जोर धरत असून करियर तसेच आयुष्यात स्थिरता येण्यासाठी वयाची तिशी कधी येते ते कळत नाही, ही एक मोठी समस्या निर्माण झाली आहे.

दरम्यान वैद्यकीय सर्वेक्षणात कोरोना महामारीमुळे मुंबई तसेच लगतच्या शहरांमध्ये प्रचलित झालेल्या वर्क फ्रॉम होम कल्चरमुळे बाळाचा विचार पुढे ढकलण्यात येत असून कोरोना महामारीची टांगती तलवार अशीच राहिली तर अनेक महिलांना चाळीशीमध्ये मातृत्त्व स्वीकारावे लागणार आहे.

याविषयी अधिक माहिती देताना झायनोव्हा शाल्बी हॉस्पिटलच्या स्त्रीरोगतज्ज्ञ आणि प्रसूती तज्ज्ञ डॉ. माधुरी मेहंदळे म्हणाल्या, गेल्या दोन वर्षापासून संपूर्ण जगाला कोरोना महामारीच्या परिस्थितीचा सामना करावा लागला आहे. खासगी क्षेत्रातील अनेक नागरिकांनी आपली नोकरी आणि व्यवसाय गमावला आहे. कोरोना महामारीमुळे अनेक दापंत्यानी फॅमिली प्लॅनिंग पुढे ढकलले आहे. गर्भवती महिलांना कोविड–१९ महामारीची भीती वाटत आहे, तसेच आर्थिक तंगीमुळे अनेक जोडपी लॉकडाऊननंतरही मानसिक ताणतणावामध्ये आहेत. वैद्यकीय तज्ज्ञांच्या मते मातृत्व तणावमुक्त असणे आवश्यक असून अन्यथा गर्भधारणेत अनेक गुंतागुंत निर्माण होतील. मार्च २०१९ नंतर कोरोना महामारीची सुरुवात झाली होती, लॉकडाउन तसेच लागोपाठ आलेल्या कोरोनाच्या लाटा यामुळे पालकत्व आणि घरगुती जबाबदाऱ्या जोडप्यांच्या वाढल्या. या सर्व कारणांमुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत.

# नवी मुंबईतील विविध कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करा

## भाजपने वेधले अधिकाऱ्यांचे लक्ष

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

प्रभागाची पावसाळ्यापूर्वी नाले व गटार साफसफाई शिरवणे गाव व नेरुळ सेक्टर १ परिसरात व्हावी या अनुषंगाने गुरुवारी नेरुळ ब विभाग अधिकारी नागराळे यांची भाजपच्या शिष्टमंडळाने भेट घेऊन या संदर्भात निवेदन देण्यात आले.

निवेदन देतेवेळी माजी नगरसेविका माधुरी जयेंद्र सुतार, विजय नाईक, अरुणा भोईर, मीनाक्षी हिलाल आदी भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते.



नवी मुंबईतील विविध ठिकाणी पावसाळापूर्व नाले व गटार सफाई सुरू झाली आहे. शिरवणे आणि नेरुळ सेक्टर १ परिसरात ती तातडीने सुरू करावीत, अशी मागणी माधुरी सुतार यांनी केली आहे.

या दोन्ही कामांची सुरुवात तातडीने करण्यात येतील असे आश्वासन महापालिकेचे अधिकारी नागराळे यांनी या वेळी दिले.

# जासई येथे आरोग्य तपासणी

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील जासई येथील जिजामाता हॉस्पिटल व सुयश हॉस्पिटल सिवूडस यांच्या संयुक्त विद्यमाने गुरूवारी (दि. २८) सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत उरण तालुक्यातील जिजामाता हॉस्पिटल जासई येथे भव्य मोफत आरोग्य तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.



शिबिरात रुग्णांची बीएमडी, ब्लड शुगर, ब्लड प्रेशर, इसीजी तपासणी मोफत करण्यात येणार आहे. शिवाय हाडांचे, मनक्याचे आजार, गुडघ्याचे आजार, स्त्री रोग, गर्भ पिशवीचे आजार, गर्भाशयाच्या गाठी, पांढरे पाणी जाणे, अनियमित पाळी, मूल न होणे, मूत्ररोग –मुतखडा, प्रोटेस्ट, मूत्रमार्ग विकार, दम्याचे आजार, मधुमेह, कर्करोग, फुफ्फुसाचे आजार आदी आजारांवर मोफत मार्गदर्शन तसेच शस्त्रक्रियेची गरज असल्यास ती मोफत व अल्प दरात करण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी जिजामाता हॉस्पिटल जासई ९३२१९३२३८० या नंबरवर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. रुग्णांनी पिवळे किंवा रेशन कार्ड व आधार कार्ड आणावे असे आयोजकांनी सांगितले.

# पनवेलमध्ये गरजूंना सायकलींचे वाटप

## समाजसेवेचा वारसा जपा –रवींद्र दौंडकर



**पनवेल : वार्ताहर**

समाजसेवेचे छोटेखानी कार्य सुद्धा मोठ्या कार्यात रूपांतरित होते. यामुळे प्रत्येकाने समाजसेवेचा वारसा जपला पाहिजे, असे प्रतिपादन तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दौंडकर यांनी केले. दिलासा फाउंडेशन पनवेल यांच्यातर्फे गरीब व गरजू व्यक्तींना शांतीवन येथे मोफत सायकल वाटप करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाला शांतीवनचे कार्याध्यक्ष ॲड. प्रमोद ठाकूर, कार्यवाहक विनायक शिंदे, अनिरुद्ध आदमाने, शांतिवन आश्रमशाळा मुख्याध्यापक उपस्थित होते. या वेळी सायकल मिळाल्याचा आनंद विद्यार्थी व नागरिकांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत होता. गरजू नागरिकांना सायकल मिळावी यासाठी दिलासा फाउंडेशनने नागरिकांना आवाहन केले होते. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला आणि पाच सायकली जमा झाल्या. या पाच सायकलींचे वाटप शांतीवन येथे करण्यात आले.

या वेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दौंडकर व शांतीवनचे ॲड. प्रमोद ठाकूर यांनी दिलासा फाऊंडेशनच्या उपक्रमाचे कौतुक केले. सायकल ही काळाची गरज असल्याचे ॲड.प्रमोद ठाकूर यांनी सांगितले. या कार्यक्रमाला कुष्ठरोग निवारण समिती, शांतिवनच्या अध्यक्षा रक्षाताई मेहता यांनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राथमिक शिक्षिका विजयश्री पाटील यांनी केले. कार्यक्रमास आश्रमशाळा शांतिवन शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी रत्नाकर केणी, राऊत अंजली, दीपिका गायकवाड, गोसावी राजेंद्र, मदन गायकवाड, रमेश मुरे, ललिता तातरे उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी प्रिया रोडपालकर, अनुज रोडपालकर यांचे विशेष सहकार्य लाभले. या वेळी संस्थेचे अध्यक्ष ॲड. मनोहर सचदेव, उपाध्यक्ष डॉ. कृष्णा देसाई, सचिव मयुर तांबडे, सहसचिव बाळाराम रोडपालकर, खजिनदार विशाल सावंत, सदस्य ॲड. नागेश हिरवे, हरेश साठे, रोहन गावंड, दीपक जगे, वसंत जाधव, राज भंडारी यांनी विशेष मेहनत घेतली.

यापुढेदेखील गरजू नागरिकांना सायकली वाटप करण्यात येणार आहेत, ज्यांना या उपक्रमात सहभागी व्हायचे आहे, त्यांनी ॲड. मनोहर सचदेव (७२७६६६६६६६), मयुर तांबडे (९३२३९३५०५०), डॉ. कृष्णा देसाई (९३७२६३५४४३), बाळाराम रोडपालकर (९९२०५९४१३३), ॲड. नागेश हिरवे (७९७७४७२८५१) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले.

**पनवेल : भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी सुकापूर येथील अवधूत ज्ञानेश्वर पाटील याचे वाढदिवसानिमित्त अभीष्टचिंतन केले. या वेळी जि. प. सदस्य अमित जाधव, पं.स. सदस्य भूपेंद्र पाटील, राजेश पाटील आदी उपस्थित होते.**



# शांतिनिकेतन पब्लिक स्कूलच्या प्रवेशद्वारावरच खड्डा; अपघाताला निमंत्रण

## तक्रार करूनही सिडको प्रशासनाकडून दुर्लक्ष

**पनवेल : प्रतिनिधी**

नवीन पनवेलमधील शांतिनिकेतन पब्लिक स्कूलच्या प्रवेशद्वारा समोरील गटारावरचा स्लॅब तुटला असल्याने मोठा खड्डा पडला आहे. या खड्ड्यात पाय घसरून विद्यार्थी पडल्यास मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता आहे. याबाबत तक्रार करूनही सिडको प्रशासनाने अद्याप त्याची दुरूस्ती केलेली नाही.

नवीन पनवेल सेक्टर २मध्ये शांतिनिकेतन पब्लिक स्कूल आहे. या शाळेच्या प्रवेशद्वारावर फुटपाथखाली तीन ते चार फुट खोल गटार आहे. या गटारावरील स्लॅब पडल्याने त्या ठिकाणी चार बाय अडीच फुटाचा मोठा खड्डा पडला आहे. त्यामध्ये बाटल्या, दगड आणि लोखंडी





सळ्यांचे तुकडे आहेत. त्याच्यावर शाळेने एक प्लायवूडचा तुकडा टाकून ठेवला आहे. शाळा भरताना आणि सुटताना विद्यार्थी त्याच्यावरून जातात. प्लायवूड मुलांच्या वजनाने तुटल्यास किवा त्याच्या गॅपमधून एखाद्या मुलाचा पाय गेल्यास अपघात होऊ शकतो. याबाबत समजल्यावर आरपीआयचे नवीन पनवेल अध्यक्ष अंकुश साळवे, उपाध्यक्ष संपत भोजने व पंचशील झोपडपट्टीचे अध्यक्ष पप्पू साळवे यांनी पाठपुरावा केला.

शाळेत चौकशी केली असता प्राचार्य भेटल्या नाहीत, पण तेथील शिक्षकांनी आम्ही महापालिकेला आणि सिडकोला ८ एप्रिल रोजी पत्र दिले असून सिडकोच्या अधिकार्यांनी फोटो पाहून लगेच काम करतो असे सांगितले होते, मात्र त्याकडे दुर्लक्ष झाले, असे सांगितले.

**शांतिनिकेतन पब्लिक स्कूलच्या गेटवर पडलेला खड्डा धोकादायक आहेच. शाळा सुरू झाल्याने मुले तेथून जात असतात. एखादा अपघात झाल्यास त्याची जबाबदारी आमच्यावरही येईल. यामुळे ठेकेदारला ते काम ताबडतोब करून देण्याचे व त्या गटारातील कचराही साफ करण्याचे आदेश दिले० आहेत.**
**–संतोष साळी, एईई, सिडको**

# समाजात शांतता टिकविणे महत्त्वाचे




(छाया : सलीम शेख)

■ अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांचे प्रतिपादन
■ माणगाव पोलीस ठाण्यातर्फे इफ्तार पार्टी उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**
इफ्तार पार्टीसारख्या कार्यक्रमांतून हिंदू-मुस्लिम समाजातील स्नेहभाव वाढून समाजात शांतता व बंधुत्वाचा संदेश दिला जातो, असे प्रतिपादन रायगड जिल्हा अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांनी बुधवारी (दि. २७) सायंकाळी माणगाव येथे केले.

माणगाव पोलीस ठाण्यातर्फे बुधवारी सायंकाळी पोलीस ठाण्याच्या प्रांगणात इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. उपविभागीय पोलीस अधिकारी प्रवीण पाटील आणि पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या इफ्तार पार्टीत अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे बोलत होते. समाजात शांतता टिकविणे महत्वाचे असल्याचे त्यांनी या वेळी सांगितले.

अ‍ॅड. राजीव साबळे, माणगाव तहसीलदार प्रियांका आयरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. अस्वार, महिला उपनिरीक्षक अस्मिता पाटील, तालुका रिक्षा संघटनेचे अध्यक्ष संजयआण्णा साबळे, मनसेचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष देवेंद्र गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्यांक सेलचे तालुका उपाध्यक्ष महामूद धुंद्वारे, संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीचे माजी अध्यक्ष सिराज परदेशी, साई ग्रामपंचायतीचे सरपंच हुसेनभाई रहाटविलकर, मौलाना सैफुल्ला आदींसह तालुक्यातील मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने या इफ्तार पार्टीत सहभागी झाले होते.

## रोह्यात एसटी पूर्वपदावर | २०० कर्मचारी कामावर रुजू

### संपामुळे दोन कोटींचा महसूल बुडाला


(छाया : महेश शिर्के)

**रोहे : प्रतिनिधी**
न्यायालयाच्या आदेशानंतर एसटी कर्मचारी कामावर रुजू होत असून रोहा आगारातील एसटी सेवा पुर्ववत होताना दिसत आहे. त्यामुळे प्रवाशांनी समाधान व्यक्त केले आहे. कर्मचाऱ्यांच्या संपामुळे रोहा आगाराचा सुमारे दोन कोटींचा महसूल बुडाला आहे.

एसटी कर्मचाऱ्यांचा संप सुमारे सहा महिने चालला. रोहा आगारातील चालक व वाहक मिळून सुमारे २५० कर्मचारी संपत सहभागी झाले होते. त्यापैकी २०० कर्मचारी कामावर रुजू झाले आहेत. उर्वरीत ४७ कामगार प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर कामावर रुजू होणार आहेत.

बहुतांशी कर्मचारी कामावर हजर झाल्याने रोहा आगाराची एसटी वाहतूक पुर्वपदावर आहे. एसटीच्या स्थानिक फेऱ्या सुरू झाल्या असून, रोहा-अक्कलकोट व रोहा-तुळजापूर वगळता अन्य लांब पल्ल्याच्या गाड्याही रस्त्यावर धावू लागल्या आहेत.

**रोहा एसटी आगारातून सुरूवातीला स्थानिक फेऱ्या प्राधान्याने चालू करण्यात आल्या असून त्याचा लाभ विद्यार्थी, लहान व्यवसायिक, नोकरदार यांना होताना दिसत आहे. तसेच नियमीत ३८ फेऱ्या चालू करण्यात आल्या आहेत.**
**-सोनाली कांबळे, प्रमुख, एसटी आगार, रोहा**

## केंद्राच्या अंत्योदय मोहिमेतून रायगडला मिळणार विविध लाभ

**अलिबाग : प्रतिनिधी**
स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त केंद्र शासनाच्या वतीने देशभरात अंत्योदय मोहीम राबविण्यात येणार असून या मोहिमेत रायगड जिल्ह्याची निवड करण्यात आली आहे. त्यानुसार जिल्ह्यात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असून याबाबत संबंधितांना योग्य त्या सूचना देण्यात आल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली.

अंत्योदय मोहीम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी महिला बचत गट, स्थानिक स्वयंसेवी संस्था, स्वयंसेवक, स्वातंत्र्य सैनिक, युवा गट, महाविद्यालयीन विद्यार्थी, शेतकरी गट, मच्छीमार संस्था व सोसायटी यांचे सहकार्य घ्यावे तसेच तालुका आरोग्य अधिकारी, बाल विकास प्रकल्प अधिकारी, जिल्हा अग्रणी बँकेचे तालुका प्रतिनिधी, तालुका समन्वयक यांच्या समन्वयाने ही मोहीम राबविण्यात यावी. या संदर्भात जिल्ह्यातील युवा संस्था, शिक्षण विभाग यांच्या समन्वयाने कला पथक, प्रभात फेरी, ग्रामसभा, विविध जयंती दिनी स्वातंत्र्य सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांचा सत्कार इत्यादी उपक्रमांचे नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचे औचित्य साधून १ मे रोजी सर्व ग्रामपंचायतीमध्ये अंत्योदय मोहिमेचा शुभारंभ करण्यात यावा. सदर मोहिमेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे फोटो तसेच माहितीचे संकलन तालुका स्तरावर करण्यात यावे. तसेच सदर मोहीम कालावधीत प्रत्येक महिन्यात किमान एक विशेष ग्रामसभेचे आयोजन करून त्याम ध्ये या मोहिमेची व मोहिमेंतर्गत घेतलेल्या कामांची सविस्तर माहिती देऊन जनजागृती करावी. त्याचबरोबर मोहीम कालावधीत ग्रामपंचायतीमध्ये प्रत्येक पंधरवड्यास विशेष शिबिराचे आयोजन करून विविध योजनांची कृती संगमाद्वारे अंमलबजावणी करावी. यासंदर्भात आयोजित केलेल्या कामाचे फोटो, वृत्तपत्रातील बातमी, चित्रफित इत्यादी माहिती जिल्हा समन्वय तथा सामान्य प्रशासन उपमुख्य कार्यकारी अधिकारी निलेश घुले यांना पाठविण्यात यावी. तसेच सदर माहिती ही http://akamantyodaya.nic.in या संकेतस्थळावर अपलोड करण्यात यावी, अशा सूचना डॉ. किरण पाटील यांनी केल्या आहेत.

### वैयक्तिक लाभाचे उपक्रम

आधार नोंदणी, पॅनकार्ड नोंदणी, प्रधानमंत्री जनधन खाते उघडणे, गरजू शेतकऱ्यांना किसान क्रेडीट कार्ड उपलब्ध करून देणे, मजुरांचे ई-श्रम कार्ड काढून नोंदणी करणे, प्रधानमंत्री जीवन ज्योती योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन पेन्शन योजना लाभार्थींची नोंदणी करणे, दिव्यांगाना वैद्यीक ओळखपत्र उपलब्ध करून देण्यासाठी नोंदणी करणे, प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेअंतर्गत लाभार्थींची नोंदणी व दुरूस्ती करणे, नविन महिला बचत गट स्थापन करणे, मनरेगा अंतर्गत जॉब कार्ड नोंदणी, जॉब कार्ड नूतनीकरण करणे व वैयक्तीक लाभ प्रदान करणे.

### आरोग्यविषयक उपक्रम

महिला व बालकांचे आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करणे, सॅम बालकांचा शोध घेवून त्यांना अतिरिक्त आहार पुरवणे व पोषण आहार कार्यक्रमाची माहिती देणे, प्रधानमंत्री मातृवंदन योजना व जननी सुरक्षा योजना अंतर्गत लाभार्थ्यांची निवड करून नोंदणी करणे. हर घर दस्तक योजने अंतर्गत सर्व नागरिकांचे लसीकरण पुर्ण करणे, आयुष्मान भारत कार्ड नोंदणी करणे.

### सामूहिक अन्य उपक्रम

सर्व अपूर्ण घरकूले व शौचालये पुर्ण करणे, गावातील गायी व म्हशी यांच्याकरिता लाळ खुरकत रोगाचे लसीकरण करणे.

## न्यायव्यवस्था आणि प्रसारमाध्यमांवर जनतेचा विश्वास -विनायक पात्रुडकर

### नेरळमध्ये संतोष पवार स्मृती पत्रकारिता पुरस्काराचे वितरण


(छाया : संजय मोहिते)



**कर्जत : बातमीदार, प्रतिनिधी**
प्रसारमाध्यमे आणि न्यायव्यवस्था यांच्यावर जनतेचा विश्वास असल्याने पत्रकारांवर सत्य आणि विश्वासार्ह लिखाणाची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन दैनिक लोकमतचे संपादक विनायक पात्रुडकर यांनी बुधवारी (दि. २७) नेरळ येथे केले.

कर्जत प्रेस क्लबच्या वतीने नेरळ येथील जेनी ट्युलिप शाळेच्या प्रांगणात बुधवारी संतोष पवार स्मृती पत्रकारिता पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्यात माजी आमदार सुरेश लाड यांच्या हस्ते स्व. संतोष पवार स्मृती राज्यस्तरीय संपादक पुरस्कार विनायक पात्रुडकर यांना तर जिल्हास्तरीय ज्येष्ठ पत्रकार पुरस्कार पनवेल येथील माधव पाटील यांना प्रदान करण्यात आला. त्यावेळी विनायक पात्रुडकर बोलत होते. प्रसारमाध्यमे आणि न्याय व्यवस्थेवर जनतेचा ठाम विश्वास असल्याचे मत त्यांनी या वेळी व्यक्त केले.

माथेरानवर आलेले इको सेन्सेटिव्हचे संकट दूर करण्यासाठी संतोष पवार यांनी नवी दिल्लीत जाऊन प्रयत्न केले. त्यामुळेच आज माथेरान टिकून राहिले आहे, असे सांगून माथेरानबद्दल कळवळा असलेला सर्वसाम ान्य माणसाचा हक्काचा माणूस आज आपल्यात नाही, अशी खंत माजी आमदार सुरेश लाड यांनी या वेळी व्यक्त केली. माधव पाटील यांनी या वेळी सत्काराला उत्तर दिले. कर्जतच्या नगराध्यक्षा सुवर्णा जोशी, माथेरानच्या माजी नगराध्यक्ष प्रेरणा सावंत, मनोज खेडकर यांचीही या वेळी समयोचीत भाषणे झाली.

प्रेस क्लबचे संतोष पेरणे यांनी प्रास्ताविक केले. विजय मांडे, संजय मोहिते, दर्वेश पालकर, राहुल देशमुख, कांता हाबळे, ज्योती जाधव, विलास श्रीखंडे, मल्हार पवार, संजय अभंगे, जयवंत हाबळे, गणेश पवार, अजय गायकवाड, गणेश पुरवत, ज्ञानेश्वर बागडे, भूषण प्रधान, विकास मिरगणे, नितीन पारधी, गणेश मते आणि ऋषिकेश कांबळे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आसावरी काळे यांनी केले. रायगड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष सुरेश टोकरे, नेरळचे उपसरपंच आणि भाजप तालुका अध्यक्ष मंगेश म्हस्कर, काँग्रेसचे तालुका अध्यक्ष मुकेश सुर्वे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुका अध्यक्ष सागर शेळके, रंजना धुळे, पोलीस निरीक्षक राजेंद्र तेंडुलकर, रायगड प्रेस क्लबचे उपाध्यक्ष प्रशांत गोपाळे, संतोष पवार यांच्या मातोश्री सुशीला पवार, त्यांच्या पत्नी मनीषा पवार, भगिनी बेबी गराटे आदी या सोहळ्याला उपस्थित होते.

## पेणमधील शिबिरात ३२४ जणांचे रक्तदान

**पेण : प्रतिनिधी**
संत निरंकारी मिशनच्या रायगड (४०-अ) झोनच्या वतीने पेण येथे रविवार (दि.२४) घेण्यात आलेल्या शिबिराम ध्ये ३२४ निरंकारी भक्तांनी रक्तदान केले.

**संत निरंकारी मिशनचा उपक्रम**

मानव एकता दिनानिमित्त रविवार संत निरंकारी मिशनमार्फत देशभरात २९२ रक्तदान शिबिरे आयोजित करण्यात आली होती. त्यात सुमारे ५० हजार युनिट रक्त संकलित करण्यात आले. या महारक्तदान अभियानामध्ये मिशनच्या रायगड झोन (४०-अ) च्या वतीने पेण येथे रक्तदान शिबिर घेण्यात आले. त्यात ३२४ निरंकारी भक्तांनी रक्तदान केले. रक्त संकलनासाठी रायगड जिल्हा रुग्णालय शासकिय रक्तपेढी व उल्हासनगर मध्यवर्ती रुग्णालय रक्तपेढीने आपल्या टीम पाठविल्या होत्या. पेणच्या माजी नगराध्यक्षा प्रीतम पाटील यांनी शिबिराला भेट देऊन संत निरंकारी मिशनचे कौतुक केले.


(छाया : अनिस मनियार)

## नेरळ-कळंब राज्यमार्गावर दुचाकीस्वाराचा अपघाती मृत्यू

**कर्जत : बातमीदार**
तालुक्यातील नेरळ-कळंब या राज्यम ार्गावरील अवसरे गावाच्या हद्दीत मंगळवारी (दि. २६) रात्री झालेल्या अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला.

मानिवली येथील सचिन बाळू जाधव (वय ४१) हे ड्रायव्हर म्हणून नोकरी करीत असून आपल्या कामासाठी ते मंगळवारी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास दुचाकी (एमएच ४३-एस ९७२०) घेऊन घराबाहेर पडले होते. रात्री ते परत आले नाही. बुधवारी सकाळी अवसरे गावासमोर असलेल्या स्वामी समर्थ मठाच्या बाजूला शेतामध्ये सचिन जाधव यांचा मृतदेह आणि दुचाकी आढळली.

नेरळ पोलिसांनी सचिन जाधव यांचा मृतदेह ताब्यात घेऊन कर्जत उपजिल्हा रुग्णालयात पाठविला. तेथे शवविच्छेदन केल्यानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. या प्रकरणी नेरळ पोलीस ठाण्यात आकस्मित मृत्यू अशी नोंद करण्यात आली आहे.

## महाड तालुक्यात ड्रोनद्वारे मोजणी अंतिम टप्प्यात

**महाड : प्रतिनिधी**
महाराष्ट्र शासनाच्या भूमी अभिलेख विभागाकडून ड्रोनद्वारे केली जाणारी जमीन मोजणी महाड तालुक्यात अंतिम टप्प्यात असून, या मोजणीमुळे ग्रामस्थांना त्यांच्या मिळकतीवर मिळकत प्रमाणपत्र मिळणार आहे.


(छाया : महेश शिंदे)

राज्यातील ग्रामिण भागात सातत्याने वाढत असलेली लोकसंख्या आणि विकास योजनांमुळे भौगोलिक बदल होत आहेत. यामुळे महाराष्ट्र शासनाच्या ग्राम विकास विभागाने सर्व्हे ऑफ इंडियाच्या माध्यमातून ड्रोन पद्धतीने जमीन मोजणी करण्याचा निर्णय घेतला आहे. या ड्रोनद्वारे गावठाणातील मालमत्तेचे जीआयएस आधारित रेखांकन व मुल्यांकन केले जात आहे. या मोजणीमुळे गावठाणाचे अभिलेख निश्चित केले जात असून संपूर्ण राज्यात अशा पद्धतीने मोजणी सुरु आहे. महाड तालुक्यातील १७७ गावांची ड्रोनद्वारे मोजणी केली जात आहे. २६ एप्रिलपर्यंत १३० गावे आणि १०३ वाड्यांमधील जमिनींची मोजणी केली असल्याची माहिती तालुका भूमिअभिलेख अधिकारी चौधरी यांनी दिली.

या ड्रोन मोजणीमुळे गावठाणातील प्रत्येक घराचा नकाशा तयार केला जाणार आहे. प्रत्येक घर, खुली जागा, रस्ता, गल्ली, नाला यांना नगरमापक क्रमांक दिला जाणार आहे. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या तरतुदीनुसार गावठाणामधील प्रत्येक मिळकतीचे मिळकत प्रमाणपत्र तयार केले जाणार आहे. जमीन मोजणी आता अंतिम टप्प्यात असून तालुक्यातील ग्रामस्थांना या मोजणीचा फायदा होणार आहे.

**ग्रामीण भाग आणि शहरात वाढणारी लोकसंख्या यामुळे होणारा विकास आणि भौगोलिक बदल यामुळे ड्रोणद्वारे जमीन मोजणी करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. महाड तालुक्यातील ड्रोणद्वारे मोजणी अंतिम टप्प्यात आली आहे.**
**-पांडुरंग चौधरी, तालुका भूमीलेख अधिकारी, महाड**

## थळ परिसरातील महिला बचत गटांसाठी मशीनरीचे वितरण

**अलिबाग : प्रतिनिधी**
राष्ट्रीय केमिकल्स अ‍ॅड फर्टीलायझर्स लिमिटेड (आरसीएफ) तर्फे कंपनीच्या सामाजिक दायित्वांतर्गत बुधवारी (दि. २७) किहीम येथे थळ परिसरातील महिला बचत गटांसाठी महिला सक्षमीकरण आणि मशीनरी वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात परिसरातील सुमारे ५० महिला सहभागी झाल्या होत्या.



आरसीएफ कंपनी परिसरात कार्यरत असलेल्या सुमारे वीस महिला बचत गटांच्या विनंतीनुसार सुमारे १६ लाख रुपये किमतीच्या कांडप मशीन्स, ग्रेवी मेकिंग मशीन्स आणि प्लेट मेकिंग मशीन्सची खरेदी आरसीएफ कंपनीने सीएसआर अंतर्गत केली होती. या मशीनसच्या वितरणाच्या निमित्ताने बुधवारी महिला सक्षमीकरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात आरसीएफच्या वित्त संचालक नझहत शेख यांच्या हस्ते मशीन्स महिला बचत गटांना सुपुर्द करण्यात आल्या. या कार्यक्रमात महिला सक्षमीकरणांतर्गत विनय महाबळेश्वरकर व तेजस्वी तळेकर यांनी महिला बचत गटांना उद्योजकतेच्या संधी या विषयावर मार्गदर्शन केले तर आरसीएफचे वरिष्ठ सुरक्षा व्यवस्थापक सुजीत भोईर यांनी घरगुती सुरक्षेबाबत मार्गदर्शन केले आणि प्रात्यक्षिके दाखविली.

कार्यक्रमाला रायगड जिपच्या माजी सदस्या मानसी दळवी, आरसीएफचे कार्यकारी संचालक आर. आर. कुलकर्णी, मुख्य महाव्यवस्थापक अनिरुद्ध खाडीलकर व श्रीनिवास कुलकर्णी यांच्यासह संबधित अधिकारी व परिसरातील महिला बचत गटांच्या पदाधिकारी उपस्थित होत्या.

## माणगाव विंचवली येथे शाळापूर्व तयारी मेळावा

**माणगाव : प्रतिनिधी**
विद्यार्थ्यांना शाळेची गोडी लागावी, यासाठी स्टार्स प्रकल्पांतर्गत माणगाव तालुक्यातील विंचवली येथील जिल्हा परिषद शाळे नुकताच शाळापूर्व तयारी मेळावा घेण्यात आला. या वेळी दाखलपात्र विद्यार्थ्यांची वाजतगाजत ग्रामस्थ, शाळेतील विद्यार्थी, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, शिक्षक व पालकांसह मिरवणूक काढण्यात आली.




विंचवलीचे ज्येष्ठ नागरिक किसन सुर्वे यांच्या हस्ते फित कापून शाळेतील कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. या वेळी नवागत विद्यार्थ्यांचे औक्षण करून स्वागत करण्यात आले. त्यांना फुगे भेट देण्यात आले. या विद्यार्थ्यांची उंची, वजन घेऊन पालकांना दिलेल्या नोंदणीपत्रकावर त्याची नोंद करण्यात आली मुलाना खाऊ देण्यात आला.

शाळापूर्व तयारी कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका श्रद्धा अंबुर्ले यांनी केले तर सूत्रसंचालन शिक्षिका सायराबानू चौगुले यांनी केले. शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य मोतीराम सुर्वे, वैभव सुर्वे, रश्दा ढमाले, होडगावच्या माजी सरपंच मयुरा सुर्वे, अंगणवाडी ताई सेजल साळवी, साक्षी साळवी यांच्यासह विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थ महिला या कार्यक्रमाला उपस्थित होत्या.

आयपीएलचा रनसंग्राम | आजचा सामना | पंजाब वि. लखनऊ सायं. ७.३० वा., पुणे

# गुजरातचा हैदराबादवर अखेरच्या चेंडूवर विजय

## राहुल तेवातिया-राशिद खानची तडाखेबंद फलंदाजी



**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये बुधवारी गुजरात टायटन्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात अटीतटीची लढत झाली. या सामन्यात गुजरातला एका षटकामध्ये २२ धावांची गरज असताना राहुल तेवातिया आणि राशिद खान या जोडीने षटकारांची आतषबाजी करीत विजय खेचून आणला. हैदराबादने गुजरातसमोर १९६ धावांचे लक्ष्य ठेवले होते. गुजरातने पाच गडी राखून विजय मिळवला.

१९६ धावांचे लक्ष्य गाठताना गुजरातकडून सलामीला आलेल्या वृद्धीमान साहा आणि शुभन गिल या जोडीने बहारदार खेळी केली. त्यांनी ६९ धावांची भागिदारी केली. साहाने अर्धशतकी खेळी करीत ३८ चेंडूंमध्ये ६८ धावा ठोकल्या, तर गिलने २२ धावा केल्या. हैदराबादचा वेगवान गोलंदाज उमार मलिक याने गुजरातच्या फलंदाजांना पळता भुई थोडी करून टाकली. त्याने गुजरातच्या पाच खेळाडूंना ठराविक अंतराने तंबूत माघारी धाडले. या हंगामात चांगल्या फॉर्ममध्ये असलेला हार्दिक पांड्या मात्र मैदानावर जास्त काळ तग धरू शकला नाही. पुढे मलिकने डेविड मिलर आणि अभिनव मनोहर यांना त्रिफळाचित केले. मिलरने १७ धावा केल्या, तर मनोहर खातेदेखील खोलू शकला नाही.

सोळाव्या षटकानंतर मात्र राहुल तेवातिया आणि राशिद खान या जोडीने सामना फिरवला. राशिद खानने शेवटच्या षटकात तीन आणि तेवातिया याने एक षटकार लगावत गुजरात विजय मिळवून दिला. अखेरच्या चेंडूवर तीन धावा हव्या असताना राशिदने षटकार ठोकून संघाला विजय मिळवून दिला.

त्याआधी नाणेफेक जिंकून गुजरातने सुरुवातीला गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. फलंदाजीसाठी आलेल्या हैदराबादने गुजरातसमोर विजयासाठी १९६ धावांचे आव्हान उभे केले. हैदरबादकडून सलामीला आलेल्या अभिषेक शर्माने दिमाखदार खेळी केली. त्याने ४२ चेंडूंमध्ये सहा चौकार आणि तीन षटकार लगावत ६५ धावा केल्या. कर्णधार केन विल्यम्सन मात्र चांगली कामगिरी करु शकला नाही. तो फक्त पाच धावांवर बाद झाला.

दुसऱ्या विकेटसाठी आलेला राहुल त्रिपाठी फक्त १६ धावा करू शकला. पाच षटकांमध्ये ४४ धावांवर दोन गडी बाद अशी स्थिती झाल्यामुळे हैदराबादवर दबाव वाढला. मात्र या दबावाला झुगारून तिसऱ्या विकेटसाठी आलेल्या मर्करामने अर्धशतकी खेळी केली. त्याने ४० चेंडूंमध्ये ५६ धावा केल्या. त्यानंतर मात्र हैदराबादचा एकही फलंदाज चांगली खेळी करु शकला नाही. निकोलस पूरन आणि वॉशिंग्टन सुंदर यांनी तीन-तीन धावा केल्या. तर पदार्पणातच शशांक सिंग याने कमाल केली. त्याने षटकारांची हॅट्‌ट्रिक करत सहा चेंडूंमध्ये नाबाद २५ धावा केल्या. मार्को जानसेनने नाबाद आठ धावा केल्या.

### तेजतर्रार उमरान मलिक चमकला

पाच गडी केले बाद

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये गुजरात टायटन्सविरुद्धच्या सामन्यात सनराझर्स हैदराबादचा वेगवान गोलंदाज उमरान मलिक चर्चेचा विषय ठरला. त्याने गुजरातच्या पाच गड्यांना बाद केले.

गुजरातची वृद्धीमान साहा आणि शुभमन गिल ही जोडी मैदानावर सेट झालेली असताना उमारन मलिकलने या दोघांनाही तंबुत पाठवले. सलामीचे दोन्ही फलंदाज बाद झाल्यामुळे गुजरातवर दबाव निर्माण झाला तसेच फॉर्ममध्ये असणारा गुजरातचा कर्णधार हार्दिक पांड्यालाही मलिकने बाद केले. त्याने पुढे डेविड मिलर व अभिनव मनोहर यांना बाद केले. या कामगिरीचे कौतुक होत आहे.

# बुद्धिबळ स्पर्धेत सन्मिल गुरव, शंतनु पेंडसे, अपेक्षा मरभल विजेते

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यात प्रथमच झिराड येथे खुल्या बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. या स्पर्धेतील वेगवेगळ्या गटांमध्ये सन्मिल गुरव, शंतनु पेंडसे, अपेक्षा मरभल यांनी विजेतेपद पटकाविले.

या स्पर्धेत अलिबाग, पेण, कर्जत, खालापूर, पनवेल,उरण,रोहा, मुरुड येथील एकूण १०५ स्पर्धकांनी उत्सफूर्त भाग घेतला. १३ वर्षाखालील गटात चार वर्षीय रिद्धी शेडगे आणि हिमांशू पाटील यांनी लक्ष वेधले. स्पर्धा रॅपिड पद्धतीने (२५ मिनिटे प्रत्येकी) खेळविण्यात आली.

स्पर्धेत मुख्य पंच म्हणून चंद्रशेखर पाटील यांनी तसेच सुशील गुरव, सार्थक मिंडे, श्रेयस पाटील, अमित कदम, नंदकुमार पालवे आणि प्रकाश पेडणेकर यांनी काम पाहिले.

**गटनिहाय निकाल**

खुला गट : प्रथम क्रमांक सन्मिल सुशील गुरव, द्वितीय अविषकार मरभल, तृतीय शुभम नांदगावकर, चतुर्थ साई बलकवडे, पाचवा क्रमांक अभिषेक ई, उत्तेजनार्थ श्रावणी पाटील, अभिजित गुरव व महिला विशेष बक्षीस सोफिया घट्टे; १५ वर्षांखालील गट : प्रथम क्रमांक शंतनु पेंडसे, द्वितीय निमिष वाकडे, तृतीय प्रथमेश जामगे; १३ वर्षाखालील गट : प्रथम क्रमांक अपेक्षा मारभल, द्वितीय अथर्व वाघ, तृतीय आरोही पाटील, उत्तेजनार्थ अनुश्री गुरव, रिद्धी शेडगे.



## पोयनाडमधील क्रिकेट स्पर्धेत आर्य म्हात्रेचे शतक

# पीसीए पनवेल संघ विजयी

**अलिबाग : प्रतिनिधी**

झुंझार युवक मंडळ पोयनाडच्या षष्टयब्दीपूर्ती वर्षाच्या निमित्ताने आयोजित १२ वर्षाखालील लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेतील साखळी फेरीच्या सामन्यात प्रतिक क्रिकेट अकॅडमी पनवेल संघाचा सलामीचा तंत्रशुद्ध फलंदाज आर्य म्हात्रे यांनी स्पर्धेतील तिसरे शतक आपल्या नावावर केले. त्यामुळे हा संघ विजयी झाला.

दिशा क्रिकेट अकॅडमी रोहा संघाविरुद्ध खेळतांना आर्यने १२५ चेंडूंत नऊ चौकारांच्या सहायाने नाबाद १०० धावा काढल्या. प्रथम फलंदाजी करतांना पीसीए पनवेल संघांनी ४० षटकांच्या समाप्तीनंतर सात गडी बाद २५७ धावा धावफलकावर नोंदवल्या. सलामीच्या फलंदाजीसाठी आलेल्या आर्य म्हात्रे नाबाद १००, तर पार्थ पवार ३६ व विघ्नेश पाटील यांनी २८ धावा काढून सुरेख साथ दिली. रोहा संघाकडून ऋषिकेश पिंपळकरने दोन गडी बाद केले.



प्रत्युत्तरात रोह्याचा संघ सर्व गडी गमावत ११४ धावांची मजल मारू शकला. पनवेलच्या दर्शने हॅट्‌ट्रिकसह चार गडी बाद केले, तर अजिंक्य कैयाने तीन आणि ओंकार रक्षिकर व पार्थ देवकर यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. अशा प्रकारे पनवेल संघाने सामना १४३ धावांनी एकतर्फी जिंकला. आर्य म्हात्रे सामनावीर, ऋषिकेश पिंपळकर स्टार अपोनंट, तर दर्शला मोस्ट इमर्जिंग प्लेअर म्हणून सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

**मुलींचादेखील चमकदार खेळ**

स्पर्धेत मुलांच्याबरोबर मुलीदेखील खेळताना दिसत आहेत. एजे स्पोर्ट्‌सकडून एकता शर्मा, भेंडखळ क्रिकेट अकॅडमी उरण संघाकडून अंजली गोडसे, आरिया पाटील, प्रतीक क्रिकेट अकॅडमी पनवेल संघाकडून तनिषा शर्मा, फायटर्स क्रिकेट अकॅडमी माणगाव संघाकडून अमिषा बामणे, आसमी साठे, एसबीसी महाड संघाकडून रोशनी पारधी उत्कृष्ट क्रिकेट खेळाचे प्रदर्शन करीत आहेत.


### हैदरबादचा शशांक तळपला; सहा चेंडूंमध्ये ठोकल्या २५ धावा

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये गुजरात टायटन्सविरुद्ध झालेल्या सामन्यात सनराइजर्स हैदराबादचा शशांक सिंगने चमकदार कामगिरी केली. सहाव्या विकेटसाठी मैदानावर येत त्याने पदार्पणातच अवघ्या सहा चेंडूंमध्ये नाबाद २५ धावा केल्या आहेत. विशेष म्हणजे या सहा चेंडूंमध्ये त्याने षटकारांची हॅट्‌ट्रिक केली.

शेवटच्या षटकात फलंदाजीसाठी आलेल्या शशांक सिंगने कमाल केली. आपल्या पहिल्याच सामन्यात त्याने फक्त सहा चेंडूंचा सामना केला. यामध्ये त्याने षटकारांचा पाऊस पाडला. त्याने तीन चेंडूंमध्ये सलग तीन षटकार लगावले तसेच एक चौकार आणि अन्य तीन धावांच्या मदतीने त्याने अवघ्या सहा चेंडूंमध्ये एकूण २५ धावा केल्या. पदार्पणातच मोठे फटके लगावत आश्चर्यचकित केले. त्याच्या या खेळीची सगळीकडे चर्चा आहे.

## चेन्नईच्या मोईन अलीला दुखापत; किमान एक आठवडा मैदानाबाहेर



**मुंबई : प्रतिनिधी**

चेन्नई सुपर किंग्जचा अनुभवी अष्टपैलू खेळाडू मोईन अलीच्या पायाला दुखापत झाली असून त्याला किमान एक आठवडा मैदानाबाहेर राहावे लागणार आहे. त्यामुळे तो पुढील काही आयपीएल सामन्यांमध्ये खेळू शकणार नाही.

सरावादरम्यान मोईनच्या पायाला दुखापत झाली. त्याला पंजाबविरुद्धच्या सामन्याला मुकावे लागले. त्याच्या अनुपस्थितीत चेन्नईला ११ धावांनी पराभव पत्करावा लागला. 'मोईनच्या पायाला दुखापत झाली आहे. पायाला फ्रॅक्चर नसला, तरी मोईनला तंदुरुस्त होण्यासाठी किमान सात दिवसांचा कालावधी लागेल, परंतु तो लवकरच मैदानात परतेल अशी आशा आहे,' असे चेन्नईचे प्रशिक्षक स्टीफन फ्लेमिंगो म्हणाले.

चेन्नईच्या खेळाडूंना यंदा दुखापतींनी सतावले आहे. प्रमुख वेगवान गोलंदाज दीपक चहरला आधी पाय आणि मग पाठीला झालेल्या दुखापतीमुळे यंदाच्या संपूर्ण हंगामातून माघार घ्यावी लागली. न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज ॲडम मिल्नेलाही केवळ एक सामना खेळता आला. आता मोईनही दुखापतग्रस्त झाल्याने चेन्नईची चिंता वाढली आहे.

# राजस्थान रॉयल्स वाहणार शेन वॉर्नला श्रद्धांजली

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलच्या पहिल्याच हंगामात ट्रॉफीवर नाव कोरणारा राजस्थान रॉयल्स हा संघ यंदा गुणतालिकेत अग्रस्थानी आहे. या संघाने आपला पहिला कर्णधार आणि ऑस्ट्रेलियचा महान दिवंगत क्रिकेटर शेन वॉर्नला श्रद्धांजली अर्पण करण्याचे ठरवले आहे. येत्या ३० एप्रिल रोजीच्या सामन्यादरम्यान राजस्थान संघ वॉर्नला आदरांजली अर्पण करेल.

शेन वॉर्नने आयपीएलच्या पहिल्याच हंगामात म्हणजेच २००८ साली राजस्थान रॉयल्सचे नेतृत्व केले होते. विशेष म्हणजे या पहिल्याच हंगामात राजस्थानने ट्रॉफीवर नाव कोरले. वॉर्नने राजस्थानचा कर्णधार म्हणून महत्त्वाची भूमिका बजवली होती. वॉर्नचे काही दिवसांपूर्वी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. तो ५२ वर्षांचा होता.

वॉर्नने १४५ कसोटी सामन्यांमध्ये ७०८ विकेट्‌स घेतलेल्या आहेत, तर १९४ एकदिवसीय सामन्यांत वॉर्नच्या नावावर २९३ विकेट्‌स आहेत. क्रिकेटसाठीच्या त्याच्या योगदानामुळे ३० एप्रिल रोजी राजस्थान रॉयल्स शेन वॉर्नला श्रद्धांजली अर्पण करणार आहे. या दिवशी राजस्थानचा सामना मुंबई इंडियन्सविरोधात नवी मुंबईतील डी. वाय. पाटील स्टेडियमवर होणार आहे.





### *सर्व खेळाडू परिधान करणार खास जर्सी*

*मिळालेल्या माहितीनुसार या दिवशी सामन्यादरम्यान राजस्थान रॉयल्सचे खेळाडू त्यांच्या जर्सीच्या कॉलरवर 'एसडब्ल्यू२३' ही अक्षरे लावून मैदानात उतरणार आहेत. शेन वॉर्नसाठी ही विशेष श्रद्धांजली असेल तसेच डी वाय स्टेडियमवर एक खास गॅलरी तयार करण्यात आली आहे. सामना पाहण्यासाठी आलेल्या प्रेक्षकांना या गॅलरीला भेट देता येणार आहे. शेन वॉर्नचा भाऊ जेसन वॉर्नदेखील या सामन्याला हजेरी लावणार असून त्याने आमंत्रण स्वीकारलेले आहे.*

## सी. के. नायडू क्रिकेट स्पर्धा

# मुंबई संघ विजेता; विदर्भावर मात

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

डावखुरा फिरकीपटू शाम्स मुलानीच्या प्रभावी माऱ्यामुळे मुंबईने अंतिम सामन्यात विदर्भावर ७५ धावांनी मात करीत सी. के. नायडू करंडक (२५ वर्षांखालील) क्रिकेट स्पर्धेचे जेतेपद पटकाविले. मुलानीने दुसऱ्या डावात सात, तर सामन्यात एकूण ११ गडी बाद केले.

अहमदाबाद येथे झालेल्या अंतिम सामन्यात मुंबईने प्रथम फलंदाजी करताना ४६८ धावांची मजल मारली. प्रत्युत्तरात विदर्भाचा डाव ३८५ धावांत आटोपल्याने मुंबईला पहिल्या डावात ८३ धावांची आघाडी मिळाली. मुंबईचा दुसरा डाव केवळ ११३ धावांत संपुष्टात आला. यात खिझार दाफेदार (२९), स्वामिनाथन (२२) यांनी महत्त्वाचे योगदान दिले. १९६ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना विदर्भाचा दुसरा डाव १२१ धावांत आटोपला.

**संक्षिप्त धावफलक**

मुंबई (पहिला डाव) ४६८, विदर्भ (पहिला डाव) ३८५, मुंबई (दुसरा डाव) ५३.१ षटकांत सर्वबाद ११३ (खिझार दाफेदार २९, स्वामिनाथन २२; हर्ष दुबे ७/५५), विदर्भ (दुसरा डाव) २९.२ षटकांत सर्वबाद १२१ (यश कदम ४९; शाम्स मुलानी ७/५०).

## आमदार प्रशांत ठाकूर व निरंजन डावखरे यांच्या हस्ते

# रायगडातील यशस्वी शरीरसौष्ठवपटूंचा सत्कार



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पुणे बालेवाडी येथे झालेल्या मि. युनिव्हर्स या आंतरराष्ट्रीय आणि मि. इंडिया या राष्ट्रीय स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील शरीरसौष्ठवपटूंनी सुयश प्राप्त केले. या सर्वांचा आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार निरंजन डावखरे यांच्या हस्ते नुकताच धरणा कॅम्प येथे झालेल्या आमदार चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत सत्कार करण्यात आला.

रायगडच्या उदय देवरे याने मि. युनिव्हर्सच्या ७० किलो वजनी गटात सुवर्ण व मि. इंडियामध्ये सुवर्ण, योगेश पाटीलने ६० किलो गटात रौप्य व मि. इंडियामध्ये चौथा क्रमांक, गौरी वरणकरने वूमन बॉडी फिटनेसमध्ये रौप्य व बिकिनी गटात कांस्य आणि महेश भिंगारकरने मि. युनिव्हर्सच्या ७५ किलो गटात कांस्य व मि. इंडियामध्ये रौप्यपदक जिंकले. या सर्व खेळाडूंचा तसेच रायगड बॉडीबिल्डर्स असोसिएशनचे सेक्रेटरी, प्रशिक्षक, राष्ट्रीय पंच दिनेश शेळके यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी शरीरसौष्ठवपटूंनी कबड्डीच्या मैदानात आपल्या पीळदार शरीराची प्रात्यक्षिके दाखवून उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली.

## मँचेस्टर सिटीचा रेयाल माद्रिदवर विजय

**मँचेस्टर : वृत्तसंस्था**

तारांकित मध्यरक्षक केव्हिन डीब्रूएनेच्या (एक गोल आणि एक गोलसाहाय्य) अप्रतिम कामगिरीच्या जोरावर मँचेस्टर सिटीने चॅम्पियन्स लीग फुटबॉलच्या उपांत्य फेरीतील पहिल्या टप्प्याच्या लढतीत रेयाल माद्रिदवर ४-३ असा निसटता विजय मिळवला.

डीब्रूएनेने दुसऱ्या मिनिटालाच गोल करत सिटीला १-० अशी आघाडी मिळवून दिली. डीब्रूएनेच्या पासवरच आघाडीपटू गॅब्रिएल जेसूसने (११ वे मि.) गोल करत संघाची आघाडी दुप्पट केली. माद्रिदचा आघाडीपटू करीम बेन्झेमाने ३३व्या मिनिटाला गोल केला. उत्तरार्धात फील फोडेन (५३वे मि.) आणि बर्नाडो सिल्वा (७४वे मि.) यांनी सिटीचे अन्य दोन गोल केले. तर, माद्रिदकडून व्हिनिसियुस (५५वे मि.) आणि बेन्झेमा (८२वे मि.) यांनी गोल केले.





दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com